नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १९० * * अमरावती * सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## तरुणीवर सामूहिक बलात्कार

■ वृत्तसंस्था, कानपूर, दि. ११ :

उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये तंत्रमंत्राच्या नावाखाली एका तरुणीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. ही घटना साजेठी पोलिस स्टेशन हद्दीतील एका गावात घडली. एका कुटुंबाने आपल्या मुलीला तंत्रमंत्राच्या तावडीतून सोडवण्यासाठी एका तांत्रिकाची मदत घेतली. तांत्रिकाने तरुणीच्या नातेवाईकासह तिच्यावर सामूहिक बलात्कार केला.

पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पीडित तरुणी सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्याच गावातील एका तरुणासोबत घरातून निघून गेली होती. सुमारे एक आठवड्यापूर्वी ती परत आली तेव्हा तिने तिच्या कुटुंबाला सांगितले की ती तरुणाने केलेल्या तांत्रिक विधींच्या प्रभावाखाली आहे.

## थोडक्यात..

### प्रजासत्ताक दिनापूर्वी जम्मूत सॅटेलाइट फोन ट्रेस

■ श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरच्या कानाचक भागात संशयास्पद सॅटेलाईट फोन संपर्क सापडला आहे. लष्कराने आंतरराष्ट्रीय सीमेवर शोध मोहीम सुरू केली आहे. सॅटेलाईट फोनद्वारे दहशतवाद्यांचे संभाषण ट्रॅक केल्याने महत्त्वाची माहिती समोर आली आहे. हा परिसर आंतरराष्ट्रीय सीमेपासून फक्त एक किलोमीटर अंतरावर आहे. अडवल्यानंतर लगेचच सुरक्षा दलांनी कारवाई केली आणि शोध मोहीम सुरू केली. प्रत्येक कोपऱ्यावर सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की संशयित दहशतवाद्यांनी थुराया उपग्रह उपकरणांचा वापर करून केलेले संपर्क सापडले, ज्यामुळे जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या विशेष ऑपरेशन्स ग्रुप, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलिस दल आणि लष्कराने संयुक्त शोध मोहीम हाती घेतली. जम्मूच्या बाहेरील भागात असलेले कनाचक हे आंतरराष्ट्रीय सीमेपासून फक्त एक किलोमीटर अंतरावर आहे.

### आठवीपर्यंतच्या सर्व शाळा १५ जानेवारीपर्यंत बंद

■ लखनौ : देशाच्या जवळजवळ सर्व भागात थंडीचा कडाका वाढला आहे. सततच्या थंडी आणि दाट धुक्यामुळे उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगरमधील नर्सरी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या सर्व शाळांना १५ जानेवारीपर्यंत सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जारी केलेल्या आदेशानुसार, दाट धुके आणि थंडीच्या लाटेमुळे, सर्व मंडळांच्या नर्सरी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या शाळा १५ जानेवारीपर्यंत बंद राहतील. येथील जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या सूचनांचे पालन करून, दाट धुके आणि अति थंडी लक्षात घेता,सर्व मंडळांशी (सीबीएसई/आयसीएसई/आयबी, यूपी बोर्ड आणि इतर) संलग्न असलेल्या सर्व शाळा (नर्सरी ते इयत्ता ८ वी) १५ जानेवारी २०२६ पर्यंत बंद राहतील.

# मुंबई झोपडपट्टी मुक्त करणार

## महापालिकेसाठी महायुतीचा वचननामा जाहीर



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

मुंबई महापालिकेसाठी महायुतीकडून वचननामा जाहीर करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच भाजप व शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी मुंबईमधल्या मराठी माणसांसाठी तसेच येथील गिरणी कामगारांसाठी हक्काचे घर तयार करणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच लाडक्या बहिणींना बेस्ट बसच्या तिकीटात ५० टक्के सूट देण्याचे आश्वासन महायुतीच्या वचननाम्यातून देण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईत असलेल्या मराठी माणसाच्या हिताचे आणि मराठी भाषेचे रक्षण करणे आणि वाढवणे ही आमची जबाबदारी आहे आणि आमचे वचन देखील आहे. तसेच मुंबईच्या बाहेर गेलेला मराठी माणूस हा मुंबईच्या बाहेर गेला, याला जबाबदार कोण? मुंबईत मराठी माणसाला परत आणण्याची देखील आमची जबाबदारी आहे.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत. २० हजार इमारतींना ओसी देण्याचा निर्णय आम्ही घेतला असून याची अंमलबजावणी पुढील एक वर्षात केली जाईल. झोपडपट्टी मुक्त मुंबई हे शिवसेना प्रमुखांचे स्वप्न होते. ४० लाख लोकांना घर देणे. परंतु, मागच्या अनेक वर्षात काहीच झाले नाही. वारसा सांगणाऱ्यांची ती जबाबदारी होती. परंतु आता आम्ही ते पूर्ण करणार आहोत. सुनियोजित मुंबईचा विकास करण्याचे आमची जबाबदारी असून ती आम्ही या वचननाम्यातून करणार आहोत. गिरणी कामगारांना हक्काचे घर देण्याचे आम्ही काम सुरू केले आहे. आतापर्यंत १२ हजार लोकांना घरे दिली आहेत. देशाच्या पंतप्रधानानांनी देखील घोषणा केली आहे की सर्वांसाठी घरे यानुसार आम्ही काम करत आहोत. मुंबईतला माणूस हा बाहेर जाऊ नये आणि बाहेर गेलेला पुन्हा यावा, यासाठी आमचे प्रयत्न आहेत.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई महाराष्ट्रापासून तोडली जाईल, अशी टीका विरोधक आमच्यावर करत असतात. पण पंतप्रधान मोदींनी मुंबईला फार महत्त्व दिले आहे. मुंबईला फीनटेक सीटी करण्याचा निर्धार आमचा आहे. बीकेसीला इंटरनॅशनल फायनान्स सर्व्हिस सेंटर, स्टार्टअप हब उभारले जाणार आहेत. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंचे जन्मशताब्दी वर्ष असून महापालिकेच्या माध्यमातून आम्ही विविध उपक्रम राबवणार आहोत. हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ महापालिकेच्या रुग्णालयांना संलग्न करण्याचा आमचा मानस आहे. बेस्ट बसच्या तिकीटात लाडक्या बहिणींना ५० टक्के सवलत, लघु उद्योजकांना ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, कोळीवाडा आणि गावठाण यांचे स्वतंत्र डीसीआर तयार करून पुनर्विकास, पुनर्विकास प्रकल्प राबवताना जी काही अडथळे येत होती, सगळे अडथळे आम्ही दूर केले आहेत. पाणीपट्टीत दरवर्षी ८ टक्के वाढ होते, पण ही वाढ पुढील ५ वर्षांसाठी स्थगित केली आहे. प्रदूषणमुक्त मुंबई करण्यासाठी १७ हजार कोटी रुपये खर्च करून पर्यावरण संवर्धन करणे, प्रदूषित पाणी समुद्रात सोडणे बंद केले जाणार. मुंबई खड्डेमुक्त करणार, असे आश्वासन शिंदेंनी दिले आहे.

### महायुतीच्या वचननाम्यातील मुद्दे

* मुंबईला पाणीपुरवठा पुढील ५ वर्षात गारगाई, पिंजाळ, दमणगंगा प्रकल्प पूर्ण करणार
* पर्यावरण संवर्धन योजनेमार्फत १७ हजार कोटी रुपये
* बीएमसी मार्केटमध्ये मासळी विक्रेत्यांसाठी कोल्ड स्टोरेज उभारणार
* सर्व भाजी मंडईचे नुतनीकरण आणि पुर्नविकास करणार
* फिश इम्पोर्ट आणि एक्सपोर्ट सेंटर स्थापन करण्यात येणार
* लघु उद्योग धोरण राबवले जाणार
* पुर्नविकासाला जलदगती देणार, पागडीमुक्त मुंबई आणि फनेल झोनप्रश्नी योजना राबवणार
* बेस्टमध्ये २०२९ पर्यंत पूर्णपणे इलेक्ट्रिक बसेस
* बेस्टमध्ये महिलांना ५० टक्के सवलत
* बेस्ट बसेसची संख्या ५ हजारवरुन १० हजारांवर जाणार
* स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरची उभारणी करणार
* लाडक्या बहिणींना ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज
* रोहिंग्या व बांगलादेशी मुक्त मुंबई करणार
* पालिकेत मराठी भाषा विभागाची स्थापना करणार
* मराठी कला केंद्र आणि अभ्यासिकेची उभारणी करणार
* बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दीनिमित्ताने मराठी तरुणांसाठी विशेष कार्यक्रम

# भाजपाने मुंबई, महाराष्ट्र आणि देश विकायला काढला



## राज ठाकरेंचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :

महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईच्या राजकीय इतिहासात आज सुवर्णक्षरांची नोंद होणार आहे. दादर येथील ऐतिहासिक शिवतीर्थावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची संयुक्त विराट जाहीर सभा झाली.

राज ठाकरे म्हणाले, मुंबई छत्रपती आंतरराष्ट्रीय विमानतळावरील डोमेस्टीक आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे नवी मुंबईला नेणार. ही प्रोसेस हळूहळू सुरू झालेली आहे. पुढे धारावी लागून असलेले मुंबईचे संपूर्ण विमानतळ विकायला काढणार. शिवाजी पार्क मैदानाएवढी ५० ते ६० पार्क तिथे बसतील, एवढा प्लॉट आहे तो. स्वकियांचा घात करणारी औलाद ही फक्त पक्षांमध्ये नसते. राजकीय पक्षांमध्ये आल्याचे मला कळलंय. सत्ता डोक्यात गेलीये. हा भूगोल नीट समजून घ्या. वाढवण बंदाराला लागून लगेच गुजरात आहे. मुंबई गुजरातला न्यायची यांच्या पहिल्यापासून डोक्यात आहे. मुंबई गुजरातला नेण्यासाठी पालघर जिल्हा ताब्यात घ्यावा लागेल, ठाणे जिल्ह्याचा भाग, एमएमआर रिजनचा भाग ताब्यात घ्यावा लागेल. तर मुंबईपर्यंत पोहोचता येईल. पैसे बदाबद टाका, मतदारसंघ फोडा, मराठी माणसांना फोडा, मतदारसंघ ताब्यात घ्या आणि नंतर सांगा खासदार, आमदार, नगरसेवक आमचाच. महापालिका आमच्याच ताब्यात.

तुळजापूरमध्ये ड्रग्ज रॅकेटमधील माणसाला तिकीट दिले. तुमच्या नाकावर टिच्चून ते तिकीट दिले. बदलापूर बलात्काराच्या केसमधील आरोप तुषार आपटेला नगरसेवक केले. लहान मुलींवर बलात्कार केल्याचा आरोप असलेला माणूस नगरसेवक. एवढी हिंमत कुठून आली? ज्यावेळेला वेड्यावाकड्या पद्धतीने निवडणुका जिंकण्याचे यंत्र किंवा तंत्र हस्तगत होते, हा माज त्यातून येतो. मुंबई, महाराष्ट्र, देश विकायला काढलाय. आपल्यासमोर काय वाढून ठेवले याचा अंदाजही नाहीये.

# ज्या संस्कृती इतरांना नष्ट करून वाढू पाहतात त्या स्वतःच नष्ट होतात : पंतप्रधान

■ वृत्तसंस्था, सोमनाथ, दि. ११

पंतप्रधान मोदी आज (रविवार) सोमनाथला भेट देत आहेत. त्यांनी येथील शौर्य यात्रेत भाग घेतला. या दरम्यान त्यांनी सोमनाथ मंदिरात प्रार्थना केली आणि मंदिराच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांना श्रद्धांजली वाहिली. पंतप्रधान मोदी म्हणाले, "सोमनाथ मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून मला सोमनाथ स्वाभिमान पर्वात सक्रियपणे सहभागी होण्याची संधी मिळाली हे मी एक मोठे सौभाग्य मानतो. आज देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो लोक आमच्यात सामील झाले आहेत; त्या सर्वांना जय सोमनाथ."

हा काळ अद्भुत आहे, हे वातावरण अद्भुत आहे, हा उत्सव अद्भुत आहे. एकीकडे भगवान महादेव, दुसरीकडे, समुद्राच्या लाटा, सूयार्ची किरणे, मंत्रांचा प्रतिध्वनी, श्रद्धेचा हा लाट आणि या दिव्य वातावरणात भगवान सोमनाथच्या भक्तांची उपस्थिती या प्रसंगाला भव्य आणि दिव्य बनवते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, "कल्पना करा की सुमारे १,००० वर्षांपूर्वी याच ठिकाणी वातावरण कसे असेल." तेव्हा आपल्या पूर्वजांनी आपले प्राण धोक्यात घातले होते. आपल्या पूर्वजांनी सर्वस्व अर्पण केले. सोमनाथ स्वाभिमान यात्रा जगभरातील भाविकांसाठी व्हावी अशी माझी इच्छा आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, "७२ तास सतत ओंकाराचा आवाज, ७२ तास सतत मंत्रांचा जप.



मी काल रात्री १,००० ड्रोनसह ते पाहिले, वैदिक गुरुकुलातील १,००० विद्यार्थ्यांची उपस्थिती, सोमनाथच्या १,००० वर्षांच्या गाथेचे प्रदर्शन. आणि आज, १०८ घोड्यांसह मंदिराची शौर्य यात्रा, मंत्र आणि स्तोत्रांचे अद्भुत सादरीकरण, सर्वकाही मंत्रमुग्ध करणारे आहे. ही भावना शब्दात व्यक्त करता येत नाही; फक्त वेळच ती पकडू शकते."

ते म्हणाले, "हजार वर्षांपूर्वी या ठिकाणी वातावरण कसे असेल?" तुमच्यापैकी जे येथे उपस्थित आहेत त्यांच्या पूर्वजांनी, आमच्या पूर्वजांनी, आपले जीवन धोक्यात घातले. त्यांनी त्यांच्या श्रद्धेसाठी, त्यांच्या महादेवासाठी सर्वस्व अर्पण केले. हजार वर्षांपूर्वी, त्या अत्याचारी लोकांना वाटले की त्यांनी आपल्यावर विजय मिळवला आहे, परंतु आज, हजार वर्षांनंतरही, सोमनाथ महादेव मंदिरावर फडकणारा ध्वज संपूर्ण विश्वाला भारताच्या शक्ती आणि सामर्थ्याबद्दल हाक मारत आहे.

# 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता लांबणीवर पडणार?

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ११



निवडणूक आयोगाने सांगितल्यास १६ तारखेला पैसे देणार

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात संघर्षाचा केंद्रबिंदू ठरली आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, मकर संक्रांतीपूर्वी डिसेंबर आणि जानेवारीचे एकत्रित ३००० रुपये बहिणींच्या खात्यात जमा करण्याच्या हालचाली सत्ताधाऱ्यांनी सुरू केल्या होत्या. मात्र, काँग्रेसने यावर आक्षेप घेत निवडणूक आयोगाला पत्र लिहिले असून, १४ जानेवारीनंतरच हे पैसे देण्यात यावेत अशी मागणी केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सामंजस्याची भूमिका घेतली आहे. "जर निवडणूक आयोगाने सांगितले, तर आम्ही लाडकी बहीण योजनेचा हप्ता १६ जानेवारीला देऊ," असे स्पष्टीकरण त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिले.

लोकसभा निवडणुकीनंतर महायुतीला विधानसभा निवडणुकीत सत्तेत येण्यासाठी गेमचेंजर ठरलेली ही योजना आता महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचे मुख्य हत्यार बनली आहे. भाजप नेते गिरीश महाजन आणि मुंबईतील उमेदवार तेजस्वी घोसाळकर यांनी दोन महिन्यांचे हप्ते एकत्र देण्याबाबत समाजमाध्यमांवर पोस्ट शेअर केल्या.

# जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा लांबणीवर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील ५० टक्केच्या आत आरक्षण असलेल्या १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा करण्याच्या तयारीत राज्य निवडणूक आयोग असतानाच जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात नव्याने याचिका दाखल झाली असून त्यावर सोमवारी सरन्यायाधिश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणुका ३१ जानेवारी पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगास दिले आहेत. ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण देण्याचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर सुरुवातीस सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ५० टक्के आरक्षण मयार्देतच घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते.

मात्र कालांतराने ५० टक्के मर्यादेचे उल्लंघन झाले असतानाही नगरपालिका, नगरपंचायती आणि नागपूर,चंद्रपूर महापालिकेच्या निवडणुका न्यायलयीन अंतिम निर्णयाच्या अधिन राहून घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले मात्र याच आदेशात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या बाबतीत केवळ ५० टक्के आरक्षणाची मयार्दा पाळणाऱ्याच जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.


न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यात २८८ नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणूका पूर्ण केल्या असून टप्प्यात २९ महापालिकांच्या निवडणुका येत्या १५ जानेवारी रोजी होणार आहेत. तसेच ५० टक्के आरक्षणाची मयार्दा पाळणाऱ्या लातूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घेण्याची आणि त्याचा निवडणूक कार्यक्रम पुढील आठवड्यात घोषित करण्याची तयारी आयोगाने केली होती.

पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्हयातील जिल्हा परिषदांच्या निवडणुका होत असताना ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्यामुळे २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यास आयोगाने असमर्थता दाखविली होती.

यातील बहुतांश जिल्हा परिषदा विदर्भ आणि मराठवाड्यातील असल्याने तेथील आरक्षणाचा गुंता सुटल्याशिवाय निवडणुका घेता येणार नाहीत अशी भूमिका आयोगाने घेतली होती. नगरपालिका, महापालिका प्रमाणेच ५० टक्के आरक्षणाची मयार्दा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्याही निवडणुका न्यायालयीन निर्णयास अधिन राहून घ्याव्यात अशी मागणी या याचिकेत करण्यात आली असून त्यावर सोमवारी मुख्य न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी होणार आहे.

# बेटी बचाव बेटी पढाव नाही भाजपापासून बेटी बचाव

■ वृत्तसंस्था, पनवेल, दि. ११



भारतीय जनता पक्ष स्वतःला पार्टी विथ डिफरन्स म्हणते पण ते वस्तुस्थिती तशी नाही. भाजपात गुंड, मवाली, माफिया यांना आमदार, खासदार, मंत्री केले जाते, आता तर भाजपा बलात्काऱ्यांनाही पक्षात संधी देत आहे. बदलापूरमध्ये लहान मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला भाजपाने स्विकृत नगरसेवक करून विकृतीचा कळस गाठला आहे, असा घणाघाती हल्लाबोल करत भाजपाचा बेटी बचाव, बेटी पढाव, हा पोकळ नारा असून खरे तर भाजपापासून बेटी बचाव असे चित्र आहे असे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना रविवारी पनवेल मध्ये प्रचार केला. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, उन्नाव बलात्कारातील आरोपी भाजपचा आमदार आहे, उत्तराखंड मधील अंकिता भंडारी प्रकरणातही भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची नावे समोर आली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव केलेल्या महिला खेळाडूंचे लैंगिक शोषण केल्याच्या प्रकरणात भाजपाच्या खासदाराचे नाव आलेले आहे आणि आता लहान मुलींवर लैंगिक अत्याचार केलेल्या नराधमाला भाजपाने स्विकृत नगरसेवक पदी नियुक्त केले. भाजपाने सर्व मयार्दा, नैतिकता गुंडाळून ठेवली आहे.

भारतीय जनता पक्ष व एकनाथ शिंदे यांची शिवसेना सत्तेसाठी कोणाशीही युती करत आहे. अंबरनाथमध्ये काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी पक्षातील कोणालाही न विचारता भाजपाला पाठिंबा दिला हे समजताच त्यांना काँग्रेसने तात्काळ बडतर्फ केले. पण भाजपाने मात्र त्यांना त्यांच्या पक्षात घेतले. अकोटमध्ये ओवैसी यांच्या एमआयएम पक्षाशी युती केली तर शिंदेसेनेनेही एमआयएमशी युती केली. प्रचार मात्र खान महापौर होईल, खान हवा का बाण हवा, असे सांगून धार्मिक तेढ निर्माण करायची आणि सत्तेसाठी मात्र ओवैसींच्या पक्षाशी हातमिळवणी करायची, एवढ्या खालच्या स्तराला भाजपाचे राजकारण गेले आहे.

# भारताचा न्यूझिलंडवर ४ गडी राखून विजय

■ वृत्तसंस्था, स्पोर्ट्स डेस्क, दि. ११

भारताने एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला. यासह, टीम इंडियाने ३ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील दुसरा सामना १४ जानेवारी रोजी राजकोट येथे खेळला जाईल.

रविवारी, भारताने वडोदराच्या कोटाम्बी स्टेडियमवर नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने ५० षटकांत ८ विकेट्सच्या मोबदल्यात ३०० धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारतीय संघाने ४९ षटकांत ६ विकेट्स गमावून विजय मिळवला. केएल राहुलने ख्रिश्चन क्लार्कच्या चेंडूवर षटकार मारत विजय निश्चित केला.



कोहलीच्या ९३ धावा, कर्णधार गिलचे अर्धशतक

कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. त्याने २६ वी धाव करत हा टप्पा गाठला आहे. सचिन तेंडुलकर (३४३५७ धावा) यांच्याकडे सर्वाधिक धावा आहेत. श्रीलंकेचा कुमार संगकारा (२८०१६ धावा) दुसऱ्या स्थानावर आहे. या डावातील दुसऱ्या षटकारासह रोहित एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार मारणारा सलामीवीर ठरला. त्याने वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलचा ३२८ षटकारांचा विक्रम मोडला. रोहितकडे आता १९३ एकदिवसीय सामन्यात सलामीवीर म्हणून ३२९ षटकार आहेत. सर्व फलंदाजी स्थाने एकत्रित करून, रोहित शर्माच्या नावे एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम आधीच आहे. त्याच्या नावावर ३५७ षटकार आहेत.

न्यूझीलंडच्या तीन फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. डॅरिल मिशेलने ७१ चेंडूत ८४ धावा केल्या. हेन्री निकोल्सने ६२ आणि डेव्हॉन कॉनवेने ५६ धावा केल्या. भारताकडून मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा आणि हर्षित राणा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. कुलदीप यादवने एक बळी घेतला.

# शिवसेना ठाकरे गटाच्या निष्ठावंत दगडू सकपाळ शिंदे गटात

## दादांचे नेतृत्व दगडासारखे मजबूत : एकनाथ शिंदे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार दगडू सकपाळ यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. म्हातारा झाल्यावर माणसाची गरज संपते, असे निराशाजनक विधान सकपाळ यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्यानंतर त्यांनी आज एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी दगडू सकपाळ यांनी त्यांच्या मुलीला, रेश्मा सकपाळ यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाकडे केली होती. मात्र, त्यांच्या पदरी निराशा पडली. त्यानंतर सकपाळ नाराज झाले होते. लालबाग, परळ तसेच शिवडी परिसरात त्यांनी शिवसेनेचे मोठे वर्चस्व निर्माण केले होते. परंतु, पदरी निराशा पडल्याने त्यांनी अखेर शिवसेना ठाकरे गटाला रामराम ठोकला आणि शिंदे गटात प्रवेश केला आहे.

आपले संपूर्ण कुटुंब शिवसेनेत (ठाकरे गट) कार्यरत आहे. अनेक आंदोलनांमध्ये सक्रिय सहभागी झाल्यानंतर आपल्यावर गुन्हे दाखल झाले. पक्षासाठी झोकून काम केले. गेल्या १५ वर्षांमध्ये पक्षाकडे आपण काहीच मागितले नाही. आपल्या हयातीत मुलगी नगरसेविका व्हावी अशी इच्छा होती. त्यामुळे मुलीला उमेदवारी मिळावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. परंतु पदरी निराशा आली. शिवसेनेनेच मला मोठे केले. पण इतकी वर्षे सक्रिय सहभागानंतर पक्षाने आपल्याला दणका दिला, अशी खंत दगडू सकपाळ यांनी बोलून दाखवली.



दगडू सकपाळ यांच्या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, दगडू सकपाळ यांनी शिवसेना वाढवण्यासाठी अपार कष्ट घेतले. दगडू दादांच्या प्रवेशामुळे खऱ्या अर्थाने लालबाग राजाचा आशीर्वाद शिवसेनेला मिळाला आहे. दगडू दादांचे नेतृत्व बघितले तर दगडासारखे कणखर आणि मजबूत आहे. दगडू दादा हे मुंबईतल्या शिवसेनेच्या पायाचा दगड आहे. पाया मजबूत असेल तर इमारत मजबूत होते.

### बाळासाहेब ठाकरे यांच्या एका इशाऱ्यावर दोन तासात मुंबई बंद होऊ शकत होती

# आता कोणात दम नाही : फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीच्या प्रचारामध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यातच आज शिवसेना (ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी एका मुलाखतीत बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे. आम्ही आजही मुंबई १० मिनिटांत बंद पाडू शकतो, असं विधान संजय राऊत यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या एका इशाऱ्यावर दोन तासात मुंबई बंद होऊ शकत होती. मात्र, आता मुंबई १० मिनिटांत बंद पाडण्याची यांच्यात कोणात दम नाही, असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांच्या वक्तव्यावर जोरदार टीका केली आहे. ते एनडीटीव्हीच्या कार्यक्रमात बोलत होते.

संजय राऊत यांच्या वक्तव्याबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही अशा पोकळ धमक्यांना घाबरणारे लोक नाहीत, हे लक्षात घ्या.



जर तुमची (उद्धव ठाकरे यांची) ताकद एवढीच होती तर तुम्हीच आव्हान दिलं होतं की, जेव्हा एकनाथ शिंदे गुवाहाटीला गेले होते, तेव्हा ते मुंबईत येतील तेव्हा त्यांना मुंबईत एन्ट्री करू देणार नाहीत, शिंदे मुंबईत पाऊल ठेऊ शकणार नाहीत.

मुंबईत ते पुढे जाऊ शकणार नाहीत, असं आव्हान त्यांनी दिलं होतं. मात्र, तरीही शिंदे मुंबईत आले, ५० आमदारांबरोबर आले, याच मुंबईच्या रस्त्यांवरून शिंदे आणि आम्ही राजभवनात गेलो. त्यानंतर आम्ही सरकार स्थापन केलं असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मुंबई बंद करणं तर सोडा, ते (संजय राऊत) त्यांच्या घराभोवतीचा परिसरही बंद करू शकले नाहीत. त्यामुळे हे सगळं फक्त बोलायच्या गोष्टी आहेत. मात्र, जेव्हा बाळासाहेब ठाकरे होते, तेव्हा शिवसेनेची ताकद होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या एका इशाऱ्यावर दोन तासात मुंबई बंद होऊ शकत होती. मात्र, आता यांच्यात कोणात दम नाही. संजय राऊत दिवसभर अशा पद्धतीचं फक्त बोलत असतात, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

#### संजय राऊतांचं वक्तव्य काय?

मुंबई पालिका हातातून गेली तर शिवसेनेचं (उद्धव ठाकरे) राजकीय भविष्य संपेल असं वाटतं का? यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, ठाकरे कधीच हद्दपार होणार नाहीत. आम्ही खूप निवडणुका हरलो आहोत, आम्ही खूप कमी निवडणुका जिंकलो आहोत. निवडणुकीत हार-जीत होत असते. आमचं संघटन मजबूत आहे. आजही आम्ही १० मिनिटांत मुंबई बंद करू शकतो. ही आमची सर्वांत मोठी अचिव्हमेंट आहे. ठाकरे वाचले तर मराठी माणूस आणि मुंबई वाचेल. हे सर्वांना माहीत आहे. हे देवेंद्र फडणवीसांनाही माहीत आहे, विनोद तावडेंनाही माहिती आहे, असं संजय राऊतांनी एनडीटीव्ही या वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटलं होतं.

## पत्नीच्या प्रसूतीसाठी सुट्टीवर आलेल्या जवानाचा अपघातात मृत्यू

■ वृत्तसंस्था, सातारा, दि. ११



भारतीय सैन्य दलात सिकंदराबाद-श्रीनगर येथे कर्तव्य बजावणारे सातारा तालुक्यातील दरे गावचे सुपुत्र जवान प्रमोद परशुराम जाधव यांचा पत्नीच्या प्रसूतीसाठी सुट्टीवर गावी आले असताना अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. आपल्या कुटुंबातील नव्या सदस्याच्या स्वागतासाठी आणि आनंदाच्या क्षणी सहभागी होण्यासाठी घरी परतलेल्या या वीर जवानाचा अशा प्रकारे अपघाती अंत झाल्याने दरे गावासह संपूर्ण परळी खोऱ्यावर शोककळा पसरली असून परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

काळाचा अत्यंत क्रूर खेळ या घटनेतून समोर आला असून, आईच्या पश्चात पत्नीच्या बाळंतपणासाठी आठ दिवसांपूर्वीच सुट्टीवर आलेल्या जवान प्रमोद जाधव यांचा वाढे फाट्याजवळ आयशर टेम्पोच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. एकीकडे आज सकाळी त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी मूळ गावी दरे येथे आणले जात असतानाच, दुसरीकडे त्यांच्या पत्नीने एका गोंडस कन्येला जन्म दिला. घरात नव्या जीवाच्या आगमनाचा आनंद साजरा होण्याऐवजी कुटुंबाचा आधारवड गेल्याने, पित्याचा मृत्यू आणि मुलीचा जन्म अशा हृदयद्रावक प्रसंगाने संपूर्ण सातारा जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

वीर जवान प्रमोद जाधव यांच्या अंत्यसंस्कारावेळी एक अत्यंत हृदयद्रावक आणि मन हेलावून टाकणारा प्रसंग पाहायला मिळाला. अवघ्या काही तासांपूर्वीच जन्मलेल्या चिमुकलीला जेव्हा आपल्या वडिलांच्या अंतिम दर्शनासाठी आणण्यात आले, तेव्हा उपस्थित जनसमुदायाचे डोळे पाणावले. शासकीय इतमामात आणि 'वीर जवान अमर रहे'च्या घोषणांमध्ये या देशपुत्राला साश्रू नयनांनी अखेरची मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी, माजी सैनिक, ग्रामस्थ आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या लाडक्या लेकीचा चेहरा पाहण्यापूर्वीच काळाने हिरावून नेलेल्या या पित्याच्या अकाली निधनामुळे आणि नियतीच्या या क्रूर खेळामुळे संपूर्ण सातारा जिल्ह्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## महिलांना दर्शन सुलभ होण्यासाठी पुरुषांनी घ्यावे मुखदर्शन

### विठ्ठल- रुक्मिणी मंदिर समितीकडून आवाहन





■ वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. ११

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये प्रतिवर्षी प्रमाणे परंपरेनुसार मकरसंक्रांत उत्सव साजरा करण्यात येत आहे. मकरसंक्रांतीच्या उत्सवानिमित्त भोगीला दि.१३ जानेवारी रोजी श्री रुक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा पहाटे ३ ते ४.३० या वेळेत करण्यात येणार आहे. यावेळी दि. १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांतीनिमित्त माता व भगिनींना श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन सुलभ व्हावे, याकरिता पुरूष भाविकांनी शक्यतो मुखदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

तसेच माता व भगिनींना श्री रुक्मिणी मातेस भोगी करावयाची असेल, त्यांनी मंदिरामध्ये पहाटे ४.३०ते ५.३० या वेळेत करावी. त्यादिवशी पहाटे ५.३० नंतर श्री रुक्मिणी मातेस पोषाख व अलंकार परिधान करण्यात येतील. सकाळी ६.३० वाजेपर्यंत दर्शन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

भाविकांच्या सोईच्या दृष्टीने दि. १३ जानेवारी रोजी श्री विठ्ठलाकडील काकडा आरती व नित्यपूजा पहाटे ४.३० ते ५.४५ या वेळेत होऊन पदस्पर्श दर्शन पहाटे ६ नंतर सुरू करण्यात येणार आहे. दि. १४ जानेवारी रोजी नेहमीच्या वेळेमध्ये मकरसंक्रांतीनिमित्त श्री रुक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा झाल्यानंतर श्री रुक्मिणी मातेस अलंकार परिधान केले. नंतर दर्शन सुरू करण्यात येणार आहे. तसेच दि.१५ जानेवारी रोजी नेहमीप्रमाणे श्री रुक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा नेहमीच्या वेळेत करण्यात येणार आहे. या कालावधीत भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन, दर्शनरांग व्यवस्थापन, कमांडोज नियुक्ती, टोकन दर्शन बुकिंग व्यवस्था बंद, चांगली स्वच्छता व्यवस्था, व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, पूजेची संख्या कमी करून भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदरचा उत्सव मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर तसेच सर्व सदस्य महोदयांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येत असल्याचे प्र. व्यवस्थापक संदेश भोसले यांनी सांगितले.

# गोरेगावात भाजप-मनसे कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा

■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. ११ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता शेवटच्या टप्प्यात आला असून, राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकीकडे ठाकरे बंधू प्रत्यक्ष मैदानात उतरून सभांचा धडाका लावत असताना, दुसरीकडे कार्यकर्त्यांमधील संघर्ष आता चव्हाट्यावर येऊ लागला आहे. मुंबईच्या गोरेगाव पश्चिम परिसरात आज भाजप आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाल्याची घटना घडली. प्रभाग क्रमांक ५८ मधील अमृत नगर भागात प्रचाराचे टेबल लावण्यावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण पसरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गोरेगाव पश्चिमेकडील अमृत नगर परिसरात आपापल्या पक्षाचे प्रचार साहित्य आणि टेबल लावण्यावरून भाजप आणि मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली. मात्र, काही वेळातच या वादाने उग्र रूप धारण केले आणि दोन्ही गटांचे कार्यकर्ते एकमेकांमध्ये भिडले. या धुमश्चक्रीत दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणाबाजी आणि धक्काबुक्की करण्यात आली. या हाणामारीत मनसेचा एक कार्यकर्ता गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने अमृत नगर भागात धाव घेतली. पोलिसांनी मध्यस्थी करत दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना पांगवले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, या राड्यामुळे गोरेगाव परिसरात मोठी राजकीय खळबळ उडाली असून, दोन्ही पक्षांचे पदाधिकारी पोलिस ठाण्याबाहेर जमा झाले आहेत. सध्या या भागात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी खबरदारी घेतली जात आहे.

ही घटना नेमकी कोणाच्या चिथावणीमुळे घडली आणि यामध्ये दोन्ही बाजूने नक्की किती जण जखमी झाले आहेत, या संदर्भात गोरेगाव पोलिस सखोल तपास करत आहेत. पोलिसांनी प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवण्यास सुरुवात केली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासले जात आहेत.

याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, निवडणुकीच्या काळात शांतता भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. मुंबई महानगरपालिकेवर वर्चस्व मिळवण्यासाठी महायुती, महाविकास आघाडी आणि मनसे यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. नेते मोठ्या सभांमध्ये एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत असताना, स्थानिक पातळीवर मात्र जागेवरून आणि वर्चस्वावरून कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड इर्षा पाहायला मिळत आहे.

## बडतर्फ आयएएस पूजा खेडकर यांच्या घरी मोठी चोरी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ११

बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या औंध येथील निवासस्थानी मोठी चोरी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत पूजा खेडकर यांचे आई-वडील, घरातील वॉचमन, वाहनचालक आणि कुक असे एकूण पाच जण बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवार, ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास चतुःशृंगी पोलीस ठाण्यात औंध परिसरातील साकाळ नगर येथील नॅशनल हाऊसिंग सोसायटीमधील बंगला क्रमांक ११२ येथे चोरी झाल्याची माहिती फोनद्वारे मिळाली. घटनास्थळी पूजा खेडकर यांच्यासह त्यांचे दोन भाऊ विनय बुधवंत आणि हर्षद बुधवंत उपस्थित होते. पाहणीदरम्यान, कार पार्किंग परिसरात वॉचमन जितेंद्र सिंग बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्यानंतर पूजा खेडकर यांनी पोलिसांना त्यांच्या आई-वडिलांची खोली दाखवली, जिथे दोघेही पलंगावर बेशुद्ध अवस्थेत होते.

## मुंबई-गोवा महामार्गासाठी जनआक्रोश समितीचे जोरदार आंदोलन



■ महासागर प्रतिनिधी

रत्नागिरी, दि. ११ :

कोकणातून जाणारा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम १८ वर्ष रखडलेले आहे. या महामार्गावर अपघातांचे मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. याचा उद्रेक झाल्याने महामार्ग रोखून कोकणकरांनी संताप व्यक्त केला आहे. या अन्यायाविरोधात जन आक्रोश समितीच्या वतीने संगमेश्वर येथील सोनवी पुलाजवळ जोरदार रस्ता रोको करून आंदोलन करण्यात आले.

मुंबई गोवा महामार्ग हा कोकण वासियांचा जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. या महामार्गाचे काम गेली १८ वर्ष रखडले आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम केवळ विकासाचा प्रश्न राहिलेला नसून तो आता कोकणवासीयांच्या संयमाची, जिविताची आणि जगण्याच्या हक्काची परीक्षा बनला आहे.

अर्धवट अवस्थेत असलेल्या महामार्गामुळे रोज अपघात, मृत्यू, आर्थिक नुकसान आणि मानसिक त्रास सहन करणाऱ्या जनतेचा संताप या आंदोलनाने उफाळून आला. शासनाने रखडलेले या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे ठोस आणि लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. यावेळी उदासीन शासनाची आंदोलकांनी प्रतिकात्मक तिरडी यात्रा काढली. हा महामार्ग म्हणजे कोकणाचा मृत्यूमार्ग बनत चालल्याचा गंभीर संदेश यातून देण्यात आला. सलग एक तास महामार्ग पूर्णपणे ठप्प राहिल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या. महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याने प्रवासी, रुग्णवाहिका, मालवाहतूक वाहनांचे हाल झाले. मात्र आंदोलकांनी यासाठी प्रशासनालाच जबाबदार धरले. येथील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच उपविभागीय अधिकारी नीलेश माईनकर आणि पोलीस निरीक्षक राजाराम चव्हाण घटनास्थळी दाखल होऊन आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. या महामार्गाचे काम त्वरित सुरू न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल.

## नगरपालिकेत लैंगिक अत्याचाराच्या आरोपीला स्वीकृत सदस्य करताना लाज वाटली नाही?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

अंबरनाथमध्ये भाजपकडून लैंगिक अत्याचार प्रकरणातील संशयित आरोपीला नगरपालिकेचे सदस्यत्व दिले असून यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर टीका केली आहे. त्याला तुम्ही स्वीकृत सदस्य करतात, तुम्हाला काही लाजा वाटत नाही? असा संतप्त सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी एक निवडणूक दाखवावी ज्यात त्यांनी हिंदू-मुस्लिम वाद लावलेला नाही, माझ्याकडून मी 11 लाख इनाम देईल, असे थेट आव्हान राऊतांनी केले आहे.



संजय राऊत म्हणाले, भाजपला असे वाटते की जनता मूर्ख आहे. त्यांनी केलेल्या सर्व पापकर्मांना जनता मान्यता देईल, असे त्यांना वाटते. माघार घेण्याची ही त्यांची तिसरी वेळ आहे. एमआयएमसोबत जेव्हा युती केली आणि गोंधळ झाला तेव्हा मुख्यमंत्र्यांना सांगावे लागले, अंबरनाथमध्येही कॉंग्रेससोबत युती केली तेव्हाही मुख्यमंत्र्यांना समोर येऊन सांगावे लागले की ही युती नाही. तरीही निर्लज्जपणे अंबरनाथ-बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील एक संशयित आरोपी, तुषार आपटे, ज्याच्याविरोधात मोठा रोष निर्माण झाला होता, त्यांना अटक झाली होती आणि उघडपणे ते संघाचे काम करतात आणि त्यांना तुम्ही निर्दोषत्व सिद्ध न होता स्वीकृत सदस्य करतात अंबरनाथ नगरपालिकेत. एवढे धाडस यांच्यात येते कुठून? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, मी संशोधन करणार आहे. भाजपमध्ये त्यांच्यात एवढे धाडस येते कुठून? महाराष्ट्रात ज्या विषयावर लैंगिक अत्याचार प्रकरणी संतापाची लाट उसळली होती, तुम्हाला काही लाजा वाटत नाही? ते असतील संघाचे कार्यकर्ते, केली असेल भाजपला मदत म्हणून त्याला ही बक्षिसी देता? उत्तर प्रदेशमध्ये तो एक बलात्काराचा आरोपी सोडला.

## आयपीपीएआयच्या राष्ट्रीय परिषदेत महावितरणचा सहा पुरस्कारांनी गौरव



■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. ११ :

इंडिपेन्डंट पॉवर प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या २६ व्या राष्ट्रीय रेग्युलेटर्स अ‍ॅण्ड पॉलिसी मेकर्स परिषदेत महावितरणला ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य 'आयपीपीएआय पॉवर अवॉर्ड्स-२०२६' मध्ये विविध सहा पुरस्कारांनी शनिवारी (दि. १०) गौरविण्यात आले. यात विशेषतः स्मार्ट ग्रिड, रूफटॉप सोलर, बॅटरी स्टोरेज आणि विद्युत वाहन प्रोत्साहन या वर्गवारीमध्ये महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले.

महावितरणने तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात घेतलेली झेप विद्युत क्षेत्रात मोठे बदल घडवून आणत आहे. हे पुरस्कार त्याची पावती आहे, अशी प्रतिक्रिया देत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

इंडिपेन्डंट पॉवर प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने बेळगाव (कर्नाटक) येथे दि. ७ ते १० जानेवारीला २६ व्या राष्ट्रीय रेग्युलेटर्स अ‍ॅण्ड पॉलिसीमेकर्स परिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने केलेल्या विविध कामगिरीचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. यात १) स्मार्ट ग्रिड सोल्यूशन्सच्या अंमलबजावणीसाठी सर्वोत्तम उपयुक्तता (विजेता), २) छतावरील सौर ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देणारे सर्वोत्तम राज्य (विजेता), ३) सर्वोत्तम बॅटरी स्टोरेज प्रकल्प (विजेता), ४) ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा साठवणूक तंत्र- आयटी अ‍ॅप्लिकेशन (नवोपक्रम पुरस्कार), ५) इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणारे सर्वोत्तम राज्य (विजेता) आणि ६) ग्रीन हायड्रोजन आणि अमोनिया नियोजनातील सर्वोत्तम राज्य (उपविजेता) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे अध्यक्ष घनशाम प्रसाद, ऑल इंडिया डिस्कॉम असोसिएशनचे महासंचालक व केंद्रीय माजी ऊर्जा सचिव अलोक कुमार, पॉवर सिस्टम ऑपरेशन कॉर्पोरेशनचे माजी महासंचालक सुशील कुमार सुनी, महाराष्ट्राचे सेवानिवृत्त मुख्य सचिव अजोय मेहता यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्याहस्ते महावितरणच्या वतीने मुख्य अभियंता संदीप पाटील, अधीक्षक अभियंता अमित कुलकर्णी, अनिल गेडाम, कार्यकारी अभियंता संजय गवळी, संजय गायकवाड, जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले, उपकार्यकारी अभियंता प्रसाद दिवाण, राजेंद्र सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता कपिल जाधव, पवन देशपांडे यांनी पुरस्कार स्वीकारले. या परिषदेत वितरण व पारेषण नियोजन, अक्षय ऊर्जेला (सौर व पवन) प्राधान्याने ग्रीडमध्ये सामावून घेताना येणारा ताण व आव्हाने, मागणीचा अंदाज आणि संसाधन पर्याप्तता नियोजन, बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम्स, वीज वितरण कंपन्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या उपाययोजना, आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग आदींवर चर्चा करण्यात आली.

### ६ व्या मजल्यावरून पडून मुलाचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ११

कात्रजमधील आंबेगाव खुर्द परिसरात पतंग उडवताना इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून पडून एका १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. या दुर्घटनेस जबाबदार धरून बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इमारतीतील जिन्याला कठडे नसल्याने ही दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे.

श्लोक नितीन बांदल (वय १२, रा. स्वरा क्लासिक इमारत, सिद्धिविनायक सोसायटी, आंबेगाव खुर्द, कात्रज) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. श्लोक पाचवीत शिकत होता. श्लोकचे मामा अमोल सुभाष इंगवले (वय ३५, रा. औदुंबर निवास, कात्रज गावठाण) यांनी आंबेगाव पोलिस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंबेगाव खुर्द परिसरात एका गृहप्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे.

# एक गेल्याशिवाय शंभर येत नाही

### रामदास आठवलेंची पुण्यात विरोधकांवर काव्यातून फटकेबाजी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ११

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पुणे येथील नागपूरचाळ येथे भाजप आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) च्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतली. यावेळी त्यांनी विकास आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यावर भाजप-आरपीआय एकत्र असल्याचे प्रतिपादन केले. प्रभाग क्रमांक २ मधील अधिकृत उमेदवारांच्या समर्थनार्थ ही सभा आयोजित करण्यात आली होती.




आठवले यांनी आपल्या छोटेखानी पण प्रभावी भाषणात विरोधकांवर कवितेच्या माध्यमातून टीका केली. "एक गेल्याशिवाय शंभर येत नाही. ज्यांना संधी दिली, ते निघून गेले; मात्र जनता विकासाच्या बाजूने भक्कमपणे उभी राहते," असे ते म्हणाले. प्रभाग क्रमांक २ हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला असून, येथील मतदार भाजप-आरपीआयच्या उमेदवारांना निवडून योग्य निर्णय घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मतदारांच्या दैनंदिन प्रश्नांकडे लक्ष वेधत आठवले यांनी विकासाच्या मुद्द्यावर आरपीआय भाजपसोबत असल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्याय विभागामार्फत बेरोजगारांना रोजगाराची संधी, प्रत्येक नागरिकाला आरोग्यसेवा, विधवा भगिनींना मदत तसेच परिसराचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यासाठी भाजप-आरपीआयच्या चारही अधिकृत उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी मतदारांना केले. ॲड. रेणुका चलवादी, सुधीर वाघमोडे, आदिती बाबर आणि राहुल जाधव हे उमेदवार या सभेत उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक डॉ. हुलगेश चलवादी, ॲड. भगवान जाधव, अशोक कांबळे, मंगेश गोळे, बाळासाहेब जानराव, सुभाष चव्हाण, नानासाहेब नलावडे, प्रकाश साळुंखे, राजू बाफना, राकेश मोहिते, हर्षद जाधव, डॉ. योगेश कदम, प्रकाश सोनवणे, विनोद टोपे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्तरंजित झाली निवडणूकीची प्रचार सभा

**नववर्षात हत्येच्या घटनेने खाते उघडले | भरदिवसा 17 वर्षीय अल्पवयीन युवकाचा निर्घृण खून**


मृतक नयन वायधने





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )**- महापालिका निवडणूकीच्या प्रचार रॅली दरम्यान गांधी आश्रम परिसरात एका 17 वर्षीय युवकावर चाकूहल्ला करुन त्याची हत्या करण्यात आली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी तत्काळ बंदोबस्त वाढवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

नववर्षाच्या अवघ्या काही दिवसांतच अमरावती शहरात पहिलीच खूनाची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. गांधी आश्रम चौक परिसरात भरदिवसा साडेसतरा वर्षीय अल्पवयीन युवकाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आली. नयन नरेंद्र वायधने (वय 17 वर्षे, रा. हनुमान नगर) असे मृतकाचे नाव आहे. या घटनेमुळे शहरातील वाढत्या गुन्हेगारी धाडसावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

रविवारी (दि. 11) दुपारी सुमारे 12.05 वाजताच्या सुमारास ही घटना घडली. जुन्या वादातून दीपक ईश्वर तायडे व त्याचा भाऊ सागर ईश्वर तायडे यांनी नयनवर अचानक चाकूने हल्ला केला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार नयनवर 7 ते 8 वेळा वार करण्यात आले. काही सूत्रांनुसार शरीराच्या विविध भागांवर एकूण 19 वार करण्यात आल्याची माहिती आहे. गंभीर जखमी अवस्थेत नयनला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेनंतर गांधी आश्रम चौक परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, क्यूआरटी पथक, डी.बी. स्कॉट आणि फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

### तीन महिला ताब्यात, दोन आरोपी फरार

या प्रकरणात तीन महिला घटनास्थळी उपस्थित असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून चौकशी सुरू आहे. मुख्य आरोपी दीपक व सागर तायडे हे दोघेही फरार असून त्यांच्या शोधासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

### प्रेमप्रकरणातून हत्येची शक्यता

मृतक नयनच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा खून प्रेमप्रकरणातून झाल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. नयनचा परिसरातील एका युवतीशी संबंध होते. याच कारणावरून यापूर्वीही वाद झाले होते. घटनेच्या दिवशी युवतीच्या नातेवाईकांनी नयनला अडवून त्याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

# ट्रक व कारच्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू

## चांदूर रेल्वे - अमरावती मार्गावरील घटना





**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.11 )**- चांदूर रेल्वेपासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर चांदूर रेल्वेङ्कअमरावती मार्गावरील बासलापूर नजीक असलेल्या मच्छी तलावाजवळ रविवारी (ता. 11) दुपारी 12.15 वाजताच्या सुमारास ट्रक व कार यांच्यात समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात कार चालकाचा जागीच मृत्यू झाला.

मृत व्यक्तीचे नाव अमित गजाननराव पांडे (वय 45, रा. अमरावती) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार अमित पांडे हे आपल्या चारचाकी वाहनाने (कार क्र. एमएच 04/ इएक्स 6694) चांदूर रेल्वेकडून अमरावतीकडे जात होते. यावेळी समोरून येणाऱ्या ट्रक (क्र. एमएच 27/ बीएक्स 9498) व कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की कार पूर्णपणे चकनाचूर झाली आणि चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.


अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. जेसीबीच्या मदतीने रस्त्यावर अडथळा ठरलेली कार बाजूला करण्यात आली. तसेच कारमध्ये अडकलेला मृतदेह बाहेर काढण्यासाठी स्थानिक नागरिकांनी पोलिसांना मदत केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी स्थानिक ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. घटनास्थळी पोलीस कर्मचारी जगदीश राठोड व अतुल शिरसाट यांनी उपस्थित राहून वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

### दुसऱ्या मजल्यावरून खाली पडून बांधकाम व्यावसायिकांचा मृत्यू

**मोर्शी** - शहरातील सुप्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक, विहिपचे माजी कार्याध्यक्ष तथा शासकीय कंत्राटदार राजेश विश्वासराव बुरंगे (56) यांचे आज शनिवार, दि. 11 जानेवारी रोजी दुपारी 1ः30 वाजता अपघाती निधन झाले. बांधकामाच्या साइटवर पाहणी करत असताना दुसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याने ही दुर्दैवी घटना घडली.

# रेती घाटावर गोळीबाराने तालुका हादरला

**रॉयल्टी व वर्चस्वाच्या वादातून थरार, तिघे अटकेत, एक फरार**



**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि.11 )**- तालुक्यातील बोरगाव निस्ताने येथील रेती घाटावर शनिवारी (दि. 10 जानेवारी) पहाटे हवेत गोळीबार झाल्याची गंभीर घटना घडली. रेती उत्खननातील रॉयल्टी, श्रेय आणि वर्चस्वाच्या वादातून हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती असून, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. स्थानिकांनी या प्रकरणात राजकीय हस्तक्षेपाचा गंभीर आरोप केला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या प्रकरणी हेमंत भाऊरावजी साठे (रा. आर्वी, जि. वर्धा) यांनी मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. साठे हे बोरगाव निस्ताने येथील रेती घाटावर सुपरवायझर म्हणून कार्यरत असून, ट्रक क्रमांकानुसार रेती वाहतुकीचे काम सुरू असताना रात्री सुमारे 1 वाजताच्या सुमारास चांदूर रेल्वे येथील रेती व्यवसाय करणारे सागर पांडुरंग गाढवे, सोनू पठाण, छोटू गहूकार व जय ठाकरे हे आरोपी पांढऱ्या रंगाच्या क्रेटा चारचाकी वाहनाने (क्र. एमएच 48 एमजे 6786) घटनास्थळी आले. आरोपींनी रॉयल्टीच्या पैशावरून धनराज अशोक वर्मा यांच्यासोबत वाद घालून शिवीगाळ केली. या वादादरम्यान सागर गाढवे याने त्याच्याकडील देशी कट्ट्यातून हवेत गोळीबार केला. गोळीबारानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र नागरिकांमध्ये तीव्र दहशत निर्माण झाली.

घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व तपासाला गती देण्याचे आदेश दिले. पोलिसांनी वेगवान कारवाई करत सागर गाढवे, सोनू पठाण व जय ठाकरे यांना अटक केली असून, छोटू गहूकार फरार आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता व शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, बोरगाव रेती घाट हा यापूर्वीही अवैध उत्खनन व वर्चस्वाच्या वादांमुळे चर्चेत राहिला आहे.

# अल्पवयीन युवतीचा अश्लील व्हिडीओ व्हायरल

## ब्लॅकमेल करणारा आरोपी अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 11 )** - ओळखीचा गैरफायदा घेत 17 वर्षीय अल्पवयीन मुलीला धमकावून तिचा अश्लील व्हिडीओ तयार करून तो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा गंभीर प्रकार नांदगावपेठ येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी नांदगावपेठ पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ओम दीपक शेंदरकर (वय 21, रा. नांदगावपेठ) याला अटक केली आहे. पीडिता ही इयत्ता अकरावीत शिक्षण घेत असून गणेशोत्सव काळात झालेल्या ओळखीतून दोघांमध्ये सोशल मीडियावर संवाद सुरू झाला. या ओळखीचा गैरफायदा घेत आरोपीने पीडितेच्या प्रेमसंबंधाची माहिती वडिलांना सांगण्याची धमकी देत तिच्यावर मानसिक दबाव टाकला. भीतीपोटी तिच्याकडून अश्लील व्हिडीओ तयार करून घेत तो पाठवण्यास भाग पाडले. त्यानंतर मोबाईल दुरुस्तीच्या नावाखाली एक हजार रुपयांची खंडणी उकळली व पुन्हा पैशांची मागणी सुरू केली. संपर्क तुटताच संतप्त झालेल्या आरोपीने व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला. 9 जानेवारी रोजी तक्रार दाखल होताच पोलिसांनी गुन्हा नोंदवून 10 जानेवारीला आरोपीला अटक केली. या प्रकरणी पोक्सो कायद्यासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अन्य दोन मित्रही रडारवर

आरोपीने हा व्हिडीओ आपल्या दोन मित्रांना शेअर केल्याची माहिती समोर आली आहे. त्या दोघांना चौकशीसाठी पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले असून चौकशीनंतर त्यांच्यावरही गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

# प्रकरण गांभीर्याने न घेण्यावर उच्च न्यायालय नाराज

**अमरावती ग्रामीण एसपींना कारणे दाखवा नोटीस; 19 जानेवारीपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 11 )** - मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अलीम खान सलीम खान यांनी दाखल केलेल्या फौजदारी याचिकेवर सुनावणी करताना अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक (एसपी) यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. प्रकरण हलक्यात घेतल्याबद्दल न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, 19 जानेवारीपर्यंत सविस्तर लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठासमोर झाली. याचिकाकर्ते अलीम खान यांनी दोन पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्यावर बेदम मारहाण केल्याचा आरोप याचिकेत केला आहे.

संबंधित घटनेचे सीसीटीव्ही फुटेज न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले असून, त्याचा आढावा घेऊनच यापूर्वी एसपींना नोटीस जारी करण्यात आली होती.

याचिकेत प्रतिवादी क्रमांक 3 व 4 असलेल्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या तक्रारीकडे पोलिस प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. श्रेया भगत यांनी युक्तिवाद केला, तर राज्य सरकारच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील (एपीपी) एस. एस. हुल्के यांनी पोलिसांची बाजू मांडली. या प्रकरणाची पुढील सुनावणी 19 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

# मात्तबरांच्या प्रचार सभा, मात्र शहरांतील प्रश्नांना बगल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.11 )**- अमरावती महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारात विविध पक्षाच्या मात्तबरांच्या सभा झाल्या आहेत. हा प्रचार भरकटलेला दिसत आहे. शहराच्या विकासाला फुलस्टॉप लावणाऱ्या मूलभूत प्रश्नांवर विलक्षण शांतता पसरली आहे. वाढती गुन्हेगारी, शहरभर साचलेली अस्वच्छता, कोट्यवधी रुपयांचा फायबर टॉयलेट घोटाळा, अर्धवट इतवारा उड्डाणपुल, बंद असलेला उड्डाणपूल, रेल्वे स्टेशनच्या अस्तित्वाचा प्रश्न, तसेच नागरिकांसाठी राखीव असलेली खेळाची मैदाने भूमाफियांकडे जाण्याचा प्रकार, हे सारे मुद्दे प्रचाराच्या गदारोळात हरवून गेले आहेत. हा विकास नसून अमरावतीच्या भविष्याशी केलेला घात असल्याची भावना नागरिकांत वाढत आहे.

### महापालिका निवडणूकीचा प्रचार भरकटला

विकासाच्या नावाखाली शहराला भ्रष्टाचार, अव्यवस्था आणि असुरक्षिततेकडे ढकलले जात असताना, अनधिकृत पार्किंग, बेकायदेशीर बांधकामे, क्रीडा संकुलांची दुरवस्था, सांस्कृतिक भवनासंदर्भातील प्रश्न यावर उमेदवार बोलायला तयार नाहीत. 'भयमुक्त अमरावती' हा मुद्दा प्रचारातूनच गायब झाला आहे. त्याऐवजी प्रचाराची दिशा वेगळीच वळलेली दिसते. दोन धर्मांत जातीय तेढ निर्माण करण्याच्या आरोप-प्रत्यारोपांत सर्वजण दंग आहेत; मात्र शहराच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना दुय्यम स्थान दिले जात आहे. आधी युती न झाल्याची कारणे, नंतर सत्तेत असलेल्या पक्षांकडून स्वतंत्र उमेदवारी, 16 तारखेला सगळे आमच्यासोबत दिसतील अशा सूचक घोषणा—या साऱ्यांतून मतदारांची दिशाभूल होत असल्याचा आरोप होत आहे. युती तुटली, अपक्षांना पाठिंबा दिला, पक्षविरोधी काम केले म्हणून हकालपट्टी, तर जो पक्षाचा नाही त्याचाच प्रचार असे परस्परविरोधी चित्र शहरभर पाहायला मिळत आहे. प्रचाराच्या या धुरळ्यात खरा प्रश्न मात्र तसाच उभा आहे. अमरावती कोणत्या दिशेने चालली आहे? शहर स्वच्छ, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख कसे होणार, याची स्पष्ट उत्तरं देण्याऐवजी राजकीय गणितं मांडली जात आहेत. मतदार आता भावनिक घोषणांपेक्षा ठोस उत्तरांची अपेक्षा करत आहेत. अन्यथा, विकासाच्या नावाखालील हा मौनाचा



करार अमरावतीला आणखी महागात पडू शकतो.

# बंडखोरीविरोधात भाजपचे कडक पाऊल

**अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढविल्याचा ठपका | कारवाईमध्ये माजी नगरसेवकांचाही समावेश**






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** - अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची तारीख जवळ येत असताना शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उमेदवारीवरून निर्माण झालेली नाराजी थेट बंडखोरीत रूपांतरित झाल्याने भारतीय जनता पक्षाने पक्षशिस्तीचा कडक बडगा उगारत बंडखोरी करणाऱ्या 16 पदाधिकाऱ्यांना पक्षातून निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक रिंगणात उतरणे तसेच पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी संबंधित पदाधिकाऱ्यांना निलंबनाची पत्रे बजावली आहेत. विशेष म्हणजे, या निलंबित यादीत काही माजी नगरसेवकांचा समावेश असल्याने ही कारवाई अधिकच चर्चेचा विषय ठरली आहे. निलंबित करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये योगेश वानखडे, संजय वानरे, रश्मी नावंदर, शिल्पा पाचघरे, गौरी मेघवानी, धनराज चक्रे, सचिन पाटील, सतीश करेसिया, किशोर जाधव, विवेक चुटके, ज्योती वैद्य, संजय कटारिया, दीपक गिरोळकर, अनिशा मनीष चौबे, तृषाल वानखडे आणि मेघा हिंगलासपुरे यांचा समावेश आहे. पक्षाकडून उमेदवारी नाकारल्यानंतर आपल्या पक्षनिष्ठेचा अनादर झाल्याचा आरोप करत या पदाधिकाऱ्यांनी बंडखोरीची भूमिका घेतली होती. यापैकी काहींनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) किंवा शिवसेना (शिंदे गट) यांची उमेदवारी स्वीकारून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे, तर काहींनी अपक्ष उमेदवार म्हणून थेट भाजपविरोधात दंड थोपटले आहेत.

या पार्श्वभूमीवर, पक्ष संघटनेच्या निर्णयांच्या विरोधात जाऊन निवडणूक लढविणाऱ्यांना यापुढे पक्षात कोणतेही स्थान दिले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा भाजपने दिला आहे. ही कारवाई केवळ संबंधित बंडखोरांपुरती मर्यादित नसून, इतर असंतुष्ट पदाधिकाऱ्यांसाठीही ती एक कठोर संदेश मानली जात आहे.

### संघटनात्मक शिस्त आणि एकसंधपणा

महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर्गत असंतोष वाढत असताना भाजपाला होणारे संभाव्य नुकसान लक्षात घेऊन संघटनात्मक शिस्त आणि एकसंधपणा राखण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. आगामी निवडणुकीत या कारवाईचा नेमका काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नवनित राणांना सुट

या कारवाईमधून माजी खासदार नवनित राणा यांना वगळण्यात आले आहे. नवनित राणा या भाजपमध्ये असताना युवा स्वाभिमानचा निर्धास्तपणे प्रचार करित आहे. मात्र नवनित राणांना या कारवाईमधून का सुट देण्यात आली, हे अजूनही स्पष्ट झाले नाही.

# वकील हा समाजाच्या विवेकाचा पहारेकरी असतो - न्या. अनिल कैलोर

**ॲड. किशोर देशपांडे यांच्या 75 व्या अभिष्टचिंतन सोहळ्यात प्रतिपादन**





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.11 )**- वकील हा केवळ कायद्याचा अधिकारी नसून तो समाजपरिवर्तनाचा शिल्पकार असतो. समाजात न्याय, समानता व सत्य प्रस्थापित करण्यासाठी वकिलांनी नेहमीच पुढाकार घ्यावा लागतो आणि ॲड. किशोर देशपांडे यांनी आपल्या संपूर्ण जीवनातून हेच सिद्ध केले आहे. तो केवळ कायद्याचा सेवक नसून तो समाजाच्या विवेकाचा पहारेकरी असतो. ॲड. किशोर देशपांडे यांचे आयुष्य हेच याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. असे गौरवोद्गार मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल कैलोर यांनी काढले.

ते श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रांगणात शनिवारी ज्येष्ठ विधिज्ञ, लेखक व समाजसेवक ॲड. किशोर देशपांडे यांच्या 75 व्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानावरुन बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरन्यायाधीश भूषण गवई, न्यायमूर्ती प्रवीण पाटील, निवृत्त न्यायमूर्ती रवी देशपांडे तसेच लेखक पराग चोळकर उपस्थित होते.

यावेळी माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी ॲड. देशपांडे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी गांधीवादी विचारसरणी जपत जनतेच्या हक्कासाठी संघर्ष केला. तुरुंगवास भोगूनही त्यांनी आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही आणि राजकारणात न अडकता



समाजसेवेलाच आपले आयुष्य समर्पित केले. सत्काराला उत्तर देताना ॲड. किशोर देशपांडे यांनी अमरावती शहर व जिल्ह्याशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा उल्लेख केला. विज्ञान व तंत्रज्ञानामुळे जीवन सुखकर झाले असून समाजाने वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. नेत्यांच्या पुतळ्यांपेक्षा वैज्ञानिकांचे पुतळे उभारले गेले पाहिजेत, तसेच आध्यात्मिक क्षेत्रात भारत विश्वगुरू होऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात ॲड. किशोर देशपांडे व त्यांच्या पत्नी किशोरी देशपांडे यांचा माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या न्यायप्रियता, समाजनिष्ठा व वैचारिक ठामपणाचे मन:पूर्वक कौतुक केले.

# मकर संक्रांती २०२६ : कॅलिफोर्निया बदामांसह कापणीच्या उत्सवांमध्ये पौष्टिकतेची भर घाला

**नागपूर, ११ जानेवारी :** मकर संक्रांती भारतभर दिवस लांबण्याचे, ताज्या पीकाचे आणि नवचैतन्याचे स्वागत करते. पोन्गल, लोहरी, उत्तरायण आणि माघ बिहू यांसारख्या विविध रूपांत साजरी केली जाणारी ही सण परिपूर्णता, कृतज्ञता आणि नवसुरुवातीचे प्रतीक आहे. कुटुंबे एकत्र येऊन पारंपारिक पदार्थ आणि मिठाई तयार करत असताना, हा सण कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करून उत्सव आणि सजग पोषण यामध्ये संतुलन साधण्याची संधी देतो.

प्रथिने, आरोग्यदायी चरबी आणि अँटीऑक्सिडंट्सच्या त्यांच्या अद्वितीय संयोजनामुळे, बदामामुळे ताकद वाढते, रोगप्रतिकारशक्तीला आधार मिळतो आणि दीर्घकाळ ऊर्जा मिळते. त्यांच्या पोषक-समृद्ध स्वरूपामुळे ते सणासुदीच्या जेवणात एक नैसर्गिक जोड ठरतात, ज्यामुळे उत्सवादरम्यान अतिसेवनावर संतुलन राखण्यास मदत होते आणि संपूर्ण आरोग्यालाही आधार मिळतो.

मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली येथील रीजनल हेड डायटेटिक्स, रितिका समद्दार म्हणाल्या, मकर संक्रांतीच्या साजरीकरणात सणासुदीचे पदार्थ महत्त्वाची भूमिका बजावतात, मात्र घटकांमध्ये केलेले छोटे पण विचारपूर्वक बदल आरोग्यासाठी मोठा फरक घडवू शकतात. पोषक घटकांनी समृद्ध, नैसर्गिकरीत्या तृप्ती देणारे बदाम कार्बोहायड्रेटयुक्त पदार्थांसोबत घेतल्यास रक्तातील साखरेचे संतुलन राखण्यास मदत करतात. लाडूंमध्ये, चटकदार पदार्थांमध्ये घातले असोत किंवा तसेच खाल्ले असोत, दररोज एक मूठ कॅलिफोर्निया बदाम कुटुंबांना पोषणाशी तडजोड न करता सण साजरा करण्यास मदत करतात.

आयुर्वेदिक दृष्टिकोनातून, बदामांना 'बल्य' म्हणजेच शक्ती वाढवणारे मानले जाते आणि ते ओज वाढवण्यासाठी ओळखले जातात, जे चैतन्य आणि रोगप्रतिकारशक्तीला



आधार देते. विशेषतः हिवाळ्यात आणि वसंत ऋतूच्या सुरुवातीला फायदेशीर असलेले, त्यांचे उष्ण स्वरूप वात संतुलित करण्यास, पचनास मदत करण्यास आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यास साहाय्य करते.

आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. मधुमिता कृष्णन यांनी सांगितले, सणासुदीच्या स्वयंपाकात सहज समाविष्ट करता येणाऱ्या घटकांपैकी बदाम हा अतिशय बहुपयोगी घटक आहे. दोषांचे संतुलन राखणे, शरीराचे पोषण सुधारणे, उष्ण गुणधर्म असणे आणि नैसर्गिकरीत्या तृप्ती देणेहे सर्व गुण बदामांमध्ये एकत्र आढळतात. चटण्यांमध्ये मिसळलेले असोत, सणाच्या मिठाईत दळून वापरलेले असोत किंवा तसेच खाल्ले असोत, बदाम पोषणमूल्यांसोबतच चवीतही भर घालतात.

दैनंदिन आरोग्यासाठी संतुलित पोषणाचे महत्त्व अधोरेखित करत, न्यूट्रिशन अँड वेलनेस कन्सल्टंट शीला कृष्णस्वामी म्हणाल्या, मकर संक्रांतीचे पारंपरिक पदार्थ समृद्ध आणि उत्सवमय असतात, मात्र त्यात वापरलेले घटक खूप फरक निर्माण करतात. बदाम सणासुदीच्या स्वयंपाकात विशेष उपयुक्त ठरतात, कारण ते अतिरिक्त साखर किंवा परिष्कृत चरबी न वापरता नैसर्गिक पोत आणि पोषक घटक देतात. पारंपरिक पदार्थांमध्ये बदामांचा समावेश केल्याने कुटुंबांना सणाची भावना जपता येते आणि जेवण अधिक संतुलित व पोषणमय बनते.

सणासुदीच्या परंपरांशी असलेले आपले वैयक्तिक नाते व्यक्त करत, बॉलीवूड अभिनेत्री सोहा अली खान म्हणाल्या, मकर संक्रांती माझ्यासाठी नेहमीच कुटुंबाचा, आपुलकीचा आणि सकस अन्नाचा सण राहिला आहे. उत्सव साजरा करताना आरोग्याचीही काळजी घेतली तर तो अधिक खास वाटतो. कॅलिफोर्निया बदाम अनेक वर्षांपासून आमच्या स्वयंपाकघरात आहेत, ज्यामुळे चव आणि पोषण यामधील योग्य संतुलन साधता येते.

कुटुंबे कापणीचा आनंद साजरा करत असताना आणि पुढील दीर्घ दिवसांचे स्वागत करत असताना, कॅलिफोर्निया बदाम सणासुदीच्या परंपरांमध्ये पोषणाची भर घालण्याचा एक सोपा पण प्रभावी मार्ग ठरतात. आधुनिक पोषणशास्त्र आणि प्राचीन ज्ञान यांचा सुंदर संगम साधत, बदाम हृदयाचे आरोग्य, रोगप्रतिकारक शक्ती, दीर्घकाळ टिकणारी ऊर्जा आणि एकूण स्फूर्तीला आधार देतातज्यामुळे मकर संक्रांती अधिक निरोगी आणि आनंदी ठरते.

# ग्रो म्युच्युअल फंडने सादर केला ग्रो स्मॉल कॅप फंड

**अकोला, ११ जानेवारी :** ग्रो म्युच्युअल फंडने ग्रो स्मॉल कॅप फंडच्या लाँचची घोषणा केली आहे. हा ओपन-एंडेड इक्विटी फंड असून, प्रामुख्याने स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करणार आहे. शिस्तबद्ध बॉटम-अप गुंतवणूक पद्धतीचा अवलंब करत, ग्रो म्युच्युअल फंडच्या चौकटीवर वाजवी किमतीत गुणवत्ता आणि वाढ (कालिटी अँड ग्रोथ अॅट अ रिझनेबल प्राइस) आधारित धोरणानुसार, उच्च दर्जाच्या आणि विस्तारक्षम स्मॉल कॅप कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवली वाढ साध्य करण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

भारताची अर्थव्यवस्था सध्या सर्वांगीण परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे. भौतिक पायाभूत सुविधा, वित्तीय व्यवस्था आणि तांत्रिक क्षमतांमध्ये होत असलेली लक्षणीय सुधारणा सर्व आकारांच्या उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण करत आहे. पायाभूत सुविधांवरील वाढता खर्च, अधिक सखोल होत जाणारे भांडवली बाजार, औपचारिक कर्जसुविधांपर्यंत सुधारलेली पोहोच आणि देशव्यापी डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांमुळे लहान कंपन्यांना भेडसावणारे पारंपरिक तोटे हळूहळू कमी होत आहेत. परिणामी, आज अनेक लघुउद्योग आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी, नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आणि अधिक प्रभावीपणे स्पर्धा करण्यासाठी सक्षम स्थितीत आहेत.

इतिहास पाहता, स्मॉल कॅप शेअर्समध्ये दीर्घकालीन काळात लार्ज कॅप शेअर्सच्या तुलनेत अधिक परतावा देण्याची क्षमता दिसून आली आहे. तुलनेने लहान आधार आणि वाढीसाठी उपलब्ध असलेली मोठी संधी (हेडरूम) हे स्मॉल कॅप गुंतवणुकीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

भूतकाळातील कामगिरी भविष्यात कायम राहीलच असे नाही आणि ती भविष्यातील परताव्याची कोणतीही हमी देत नाही. वरील कामगिरी कोणत्याही विशिष्ट म्युच्युअल फंड योजनेच्या कामगिरीचे प्रतिनिधित्व करत नाही. गुंतवणूक करण्यापूर्वी कृपया आपल्या आर्थिक सल्लागारांचा सल्ला घ्या.

स्मॉल कॅप शेअर्समधून गुंतवणूकदारांना विविध आणि व्यापक अशा निश, विशेषीकृत आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहभागाची संधी मिळते, जी इतर सेगमेंटमध्ये तुलनेने कमी प्रमाणात किंवा मुळीच उपलब्ध नसते. या क्षेत्रांमध्ये रचनात्मक (स्ट्रक्चरल) बदलांचा फायदा घेणारे उद्योगही येतात, तसेच ज्या ठिकाणी केवळ व्यापक आर्थिक चक्रांपेक्षा कंपन्यांच्या स्वतःच्या अंमलबजावणी क्षमतेवरच वाढ अधिक अवलंबून असते, अशा क्षेत्रांचाही समावेश असतो. या विविधतेनंतरही स्मॉल कॅप विश्वातील मोठ्या भागावर अजूनही विश्लेषकांचे तुलनेने कमी लक्ष आहे. परिणामी माहितीतील तफावत निर्माण होते. हीच तफावत शिस्तबद्ध, संशोधनाधारित गुंतवणूकदारांसाठी वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यातील दर्जेदार कंपन्या ओळखण्याच्या संधी निर्माण करते.

# वाढता मानसिक ताण आणि नैराश्य यावर नामजप हे प्रभावी औषध : सुषमा बत्रा

**कुही/ नागपूर :** कलियुगातील धकाधकीच्या जीवनात मानसिक शांती आणि आत्मबळ मिळवण्यासाठी 'नामजप' हेच सर्वोत्तम साधन आहे. आजच्या धावपळीच्या युगात वाढता मानसिक ताण आणि नैराश्य यावर नामजप हे प्रभावी औषध आहे. नामजपामुळे केवळ मन एकाग्र होत नाही, तर अंतःकरण शुद्ध होऊन व्यक्तीची सात्विकता वाढते, असे प्रतिपादन सनातन संस्थेच्या सुषमा बत्रा यांनी केले. त्या मांढळ येथील श्री राम मंदिर सभागृहात सनातन संस्थेच्या वतीने आयोजित 'साधना प्रवचन' या विषयावरील विशेष प्रवचनात बोलत होत्या. यावेळी त्यांनी साधनेचे महत्त्व आणि दैनंदिन जीवनात नामजपामुळे होणारे सकारात्मक परिणाम यावर मार्गदर्शन केले. प्रवचनाला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेवटी अनेक जिज्ञासूंनी आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. 'साधना केल्याने जीवनात आनंद कसा मिळवता येतो', हे सुषमा बत्रा यांनी अतिशय सोप्या भाषेत मांडल्याने



उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. परिचय व प्रास्ताविक डॉ. प्रेरणा लेंडे यांनी केले. सूत्रसंचालन मेघा गवळी यांनी तर रेखा गोंदेवार यांनी आभार व्यक्त केले. यावेळी सरपंच सौ. सोनू निर्गुलकार यांची विशेष उपस्थिती लाभली. स्थानिक जिज्ञासूंच्या सहकार्याने प्रवचन संपन्न झाले.

# व्यस्त जीवनशैलीत थायरॉइडचे आजार का ओळखले जात नाहीत

**नागपूर, ११ जानेवारी :** आजच्या धावपळीच्या शहरी जीवनात, जास्त कामाचे तास, सतत मोबाइल किंवा कंप्यूटर स्क्रीनच्या समोर बसणे, अनियमित जेवणाच्या वेळा आणि सततचा ताण हे सगळेच सामान्य झाले आहे. कामाच्या डेडलाइन आणि जबाबदाऱ्यांमध्ये, लोक अनेकदा आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाहीत, विशेषतः जेव्हा आजाराचे लक्षण स्पष्टपणे दिसत नाहीत. अशाच लक्षात न येणाऱ्या आजारांपैकी एक म्हणजे थायरॉइड विकार, जो काम करणाऱ्या नोकरदार वर्गामध्ये अजूनही वेळेवर ओळखला जात नाही. डॉ. स्वरूप वर्मा, कन्सल्टंट डायबेटॉलॉजिस्ट, फिजिशियन आणि क्रिटिकल केअर तज्ज्ञ, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर यांच्या मते, शहरातील अनेक नोकरी करणारे लोक सुरुवातीची थायरॉइडची लक्षणे दुर्लक्षित करतात आणि ती वैद्यकीय समस्या न मानता फक्त तणावपूर्ण जीवनशैलीचा भाग समजतात.

थायरॉइड: लहान ग्रंथी, पण मोठा प्रभाव

थायरॉइड ही मानेमध्ये असलेली लहान, फुलपाखराच्या आकाराची ग्रंथी आहे, पण तिचे कार्य खूप महत्वाचे आहे. ही आपल्या शरीरातील चयापचय क्रिया, ऊर्जेची पातळी, हृदयाची गती, शरीराचे तापमान, आणि मानसिक आरोग्य यांना नियंत्रित करते. जेव्हा थायरॉइड ग्रंथी हळूहळू कमी (हायपोथायरॉइडिझम) किंवा खूप वेगाने (हायपरथायरॉइडिझम) काम करते, तेव्हा ती शरीरातील अनेक प्रणालींमध्ये शांतपणे अडथळा निर्माण करू शकते.

नोकरी करणारे व्यस्त लोक थायरॉइडचे लक्षणे का दुर्लक्षित करतात

लक्षणे रोजच्या थकव्याप्रमाणे वाटतात थकवा, वजन वाढणे, केस गळणे, मूड बदलणे, लक्ष केंद्रित न होणे, झोपेची समस्या ही थायरॉइडची सामान्य लक्षणे आहेत. परंतु, बहुतेक वेळा लोक हे फक्त कामाचा ताण, वय वाढणे किंवा मानसिक थकवा असे समजून दुर्लक्षित करतात.

जास्त ताण हार्मोनल असंतुलन लपवतो सततचा ताण हार्मोन्सच्या संतुलनावर परिणाम करतो आणि थायरॉईडची समस्या वाढवू शकतो. ताणामुळे दिसणारी लक्षणे थायरॉइडच्या लक्षणांसारखीच असल्याने निदान करणे कठीण होते.

नियमित आरोग्य तपासणी न करणे-वेळेच्या अभावामुळे अनेक काम करणारे लोक नियमित आरोग्य तपासणी करीत नाहीत. थायरॉइडचा आजार ओळखण्यासाठी बहुतेक वेळा फक्त साधी रक्ततपासणी पुरेशी असते.

थायरॉइड फक्त महिलांना होतो असा गैरसमज - थायरॉइड समस्या जरी महिलांमध्ये जास्त आढळत असली, तरी पुरुषांनाही ही समस्या होऊ शकते आणि ते बहुतेक वेळा तपासणी उशीर करतात.

हलकी किंवा बदलणारी लक्षणे दुर्लक्षित करणे - थायरॉइडची लक्षणे कधी कधी बदलत राहतात, त्यामुळे लोक या समस्येकडे दुर्लक्ष करतात, जोपर्यंत ती कामाची क्षमता किंवा आरोग्यावर परिणाम करत नाही.

लवकर निदान का महत्वाचे आहे

थायरॉइडचा उपचार न झाल्यास हृदयाच्या ठोक्यांमध्ये बिघाड, गर्भधारणेची समस्या, नैराश्य, चिंता, मधुमेह नियंत्रणात अडचण आणि हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.

शहरातील नोकरी करणारे लोक काय करू शकतात

सततचा थकवा किंवा अचानक वजन बदलणे याकडे दुर्लक्ष करू नका

वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करा, ज्यामध्ये थायरॉइड चाचणीचा समावेश असावा

पुरेशी झोप घ्या, नियमित व्यायाम करा आणि ताण कमी करण्याचा प्रयत्न करा



**डॉ. स्वरूप वर्मा, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर**

प्रत्येक समस्येला थकवा किंवा बर्नआउट समजण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घ्या

अखेरचे सांगायचे तर धावपळीच्या जीवनात आपल्या शरीराकडे लक्ष देणे ही ऐच्छिक गोष्ट नाही तर गरज आहे. थायरॉइडचे आजार सामान्य आहेत, नियंत्रणात ठेवता येतात आणि सहज ओळखता येतात. योग्य माहिती मिळाल्यास आणि वेळेवर तपासणी केल्यास अनेक वर्षांचा न जाणवलेला त्रास टाळता येऊ शकतो.

तुमचे आरोग्य हीच तुमची सर्वात मौल्यवान व्यावसायिक संपत्ती आहे. त्याची काळजी घ्या.

# नवीन वर्ष, नवीन सवयी: १० पैकी ७ भारतीयांच्या मते कॅलिफोर्निया बदाम वजन व्यवस्थापनास मदत करतात

**नागपूर, ११ जानेवारी :** नवीन वर्षाची सुरुवात होत असताना आणि आरोग्याची उद्दिष्ट्ये केंद्रस्थानी येत असताना, वजन व्यवस्थापन अनेकदा नवीन वर्षाच्या संकल्पांच्या यादीत अग्रस्थानी असते. लोक त्यांच्या दिनचर्येत बदल करत असताना आणि अधिक तंदुरुस्त व उत्साही वाटण्यासाठी शाश्वत मार्ग शोधत असताना, सजग आहार आणि संतुलित पोषणाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित होते.

या बदलाचे दर्शन घडवत, अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्निया च्या सहकार्याने केलेल्या नवीन YouGov सर्व्हेमध्ये असे दिसून आले आहे की, भारतीय ग्राहक आणखी आरोग्यदायी निवडी स्वीकारत आहेत नियमित व्यायाम करण्यापासून ते दैनंदिन तंदुरुस्तीला समर्थन देणारे पोषक अन्न निवडण्यापर्यंत.

यापैकी, कॅलिफोर्निया अल्मंड सकाळच्या दिनचर्येत आणि नाश्त्याच्या सवयींमध्ये प्रमुख स्थान टिकवून आहेत, आणि अनेकजण त्यांना वाढलेली तृप्ती, खाण्याच्या इच्छेवर अधिक चांगले नियंत्रण आणि दिवसभर टिकणाऱ्या ऊर्जेशी जोडतात.

भारतातील १६ शहरांमध्ये करण्यात आलेल्या या सर्व्हेमध्ये आरोग्य-केंद्रितजीवनशैलीकडे होणारा व्यापक बदल दिसून आला आहे. बहुसंख्य लोक (९२%) आरोग्य आणि पोषण यामध्ये उच्च रुची दाखवत आहेत, तर ५१% लोक दैनंदिन व्यायामासह सक्रिय जीवनशैली अंगीकारत असल्याचे सांगतात. याशिवाय, ६३% प्रतिसादक म्हणतात की ते वजन नियंत्रणासाठी प्रयत्नशील आहेत सहसा दैनंदिन व्यायाम, पुरेसे पाणी पिणे आणि साखरेचे सेवन कमी करणे यासारख्या सातत्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करून.

सजग आहाराकडे दिला जाणारा हा भर भारतभरातील बदाम सेवनाच्या सवयींमध्ये स्पष्ट दिसतो. जवळपास ४०% प्रतिसादक म्हणतात की ते दररोज बदाम खाण्याची सवय ठेवतात, त्यापैकी सुमारे ३०% सकाळी उठताच खावीत, तर २२% नाश्त्यासह त्यांचा समावेश करतात. बदाम खरेदीची वारंवारिताही मजबूत आहे ४३% लोक दरमहिन्याला खरेदी करतात, तर ४४% लोक साप्ताहिक किंवा दुःसाप्ताहिक खरेदी करतात. प्राधान्ये वेगवेगळी आहेत ३०% लोक भिजवलेले किंवा भिजवलेले व सोललेले बदाम पसंत करतात, तर २५% लोक सुरळा बदाम खाऊन तृप्ती मिळवतात. कोरडेफळ खाणाऱ्या लोकांमध्ये, ८६% लोक बदाम निवडतात, ज्यामुळे त्यांची व्यापक लोकप्रियता अधोरेखित होते.

बदाम सेवनामागील प्रेरणा त्यांच्या पोषणात्मक फायदे याबद्दल असलेल्या जाणीवेचे प्रतिबिंब दर्शवते. अर्ध्या हून अधिक प्रतिसादक (५२%) बदामांना संपूर्ण आरोग्य आणि तंदुरुस्तीशी जोडतात, तर ४१% लोक त्यांना इम्युनिटीशी संबंधित मानतात आणि ३९% लोक प्रथिने सेवन टिकवण्यासाठी खातात. महत्त्वाचे म्हणजे, ७५% लोक म्हणतात की बदाम दैनिक दिनक्रमाचा भाग आहेत आवश्यक पोषक घटकांसाठी, तर ८४% लोक हे आरोग्यदायी पर्याय मानतात. जवळपास ४०% लोक बदाम खातेवेळी कॅलरीज किंवा मॅक्रो ट्रॅक करतात, जे पोषणाबद्दल वाढत्या जाणीवेचे सूचक आहे.

ही सकारात्मक धारणा बदामांच्या नैसर्गिक पोषकत्वावर आधारित आहे. कॅलिफोर्निया बदाम १५ आवश्यक पोषक घटक प्रदान करतात, ज्यात सकारात्मक चरबी, आहार तंतू, प्रथिने, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि झिंक यांचा समावेश आहे, ज्यामुळे ते दैनंदिन आहारासाठी कमी प्रक्रियायुक्त, संपूर्ण आणि पौष्टिक अन्नाचा भाग ठरतात.

वजन व्यवस्थापन हा बदाम सेवनामागील मुख्य प्रेरक घटक म्हणून उभा राहतो. ७०% प्रतिसादकांचा असा विश्वास आहे की बदाम आरोग्यदायी वजन उद्दिष्टांना समर्थन करतात, तर ८२% म्हणतात की नियमित सेवनानंतर खाण्यावरील नियंत्रण आणि वजनात सुधारणा दिसून आली आहे. जवळपास अर्ध्यांपैकी ४७% लोक म्हणतात की त्यांनी अस्वास्थ्यदायी स्नॅक्स बदलून बदामांचा समावेश केला आहे, त्यांच्या जास्त फाइबर, प्रथिने आणि सहज उपलब्धतेमुळे. ६६% लोकांनुसार इतर कोरडेफळही वजन व्यवस्थापनात मदत करतात, तरी उच्च फाइबर आणि पोषकतेमुळे बदाम हा सर्वात पसंतीचा पर्याय राहतो. ही जाणीव विश्वासात रूपांतरित होते, ज्यामुळे ८५% प्रतिसादक बदाम इतरांना शिफारस करतात. जवळपास ६४% लोकांचा असा विश्वास आहे की बदाम सर्व वयोगटांसाठी योग्य आहेत, ज्यामुळे ते कौटुंबिक आहारासाठी बहुगुणी पर्याय बनतात.

तज्ज्ञांचे दृष्टिकोन ग्राहकांच्या वर्तणुकीला अधिक बळकट करतात. पोषण आणि आरोग्य सल्लागार, शीला कृष्णस्वामी, म्हणतात:जास्त लोक प्रॅक्टिकल आणि विश्वासार्ह मार्गदर्शन शोधत आहेत, जे ते वास्तवात पालन करू शकतात. जलद उपायांऐवजी आता पोषणतज्ज्ञ, डायटिशियन आणि विश्वसनीय तज्ज्ञांवर अवलंब वाढत आहे. या चर्चांमध्ये बदाम नैसर्गिकरीत्या येतात कारण ते परिचित, सहज समाविष्ट होणारे आणि पोषक आहेत. १५ आवश्यक पोषक घटकांसह, बदाम तृप्ती वाढवतात आणि सजग स्नॅकिंगला मदत करतात, जे लोक वजन व्यवस्थापन आणि आरोग्यदायी दिनक्रम तयार करण्यासाठी करीत आहेत, त्यासाठी आदर्श आहे. भिजवलेले असो किंवा सुरळा, सकाळी किंवा संध्याकाळी, नाश्त्यासह किंवा जेवणाचा भाग म्हणून, बदाम दररोजच्या संतुलित आहारात सहज समाविष्ट होतात.

मॅक्स हेल्थकेअर, येथील रीजनल हेड डायटेटिक्स, ऋतिका समद्दार म्हणाल्या:वर्षाच्या सुरुवातीला, मला अनेक मित्र आणि क्लायंट स्पष्ट आरोग्य व वजन व्यवस्थापन ठराव करताना दिसतात. त्यांना आलेला सर्वात सामान्य आव्हान म्हणजे भूक नियंत्रित करणे आणि निरोगी निवडींशी सातत्य राखणे. बदाम या दिनक्रमात नैसर्गिकरीत्या बसतात कारण ते तृप्ती देणारे, सहज समाविष्ट होणारे आणि पोषणमूल्यपूर्ण आहेत. त्यातील फायबर, प्रथिने आणि हेल्दी फॅट्स लालसा नियंत्रित करतात आणि सतत ऊर्जासंपन्न राहण्यास मदत करतात, ज्यामुळे ते दैनंदिन वजन नियंत्रण आणि सक्रिय जीवनशैलीसाठी व्यावहारिक अन्न ठरतात.

सांस्कृतिक सवयी देखील बदामांच्या लोकप्रियतेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. अर्ध्यांहून अधिक प्रतिसादकांचे म्हणणे आहे की उत्तर, मध्य आणि पश्चिम भारतात पारंपरिक जेवणात नियमितपणे बदामांचा समावेश केला जातो, तर पूर्व भारतातील ग्राहक त्यांचा समावेश सण आणि विशेष प्रसंगांमध्ये अधिक करतात. विश्वासार्ह माहितीचे स्रोत जसे की शब्दाचे प्रचार, पोषणतज्ज्ञ आणि फिटनेस इन्फ्लुएन्सर्स ग्राहकांच्या धारणा घडवण्यात मोठा वाटा उचलतात. वय ३५ वर्षे आणि त्यापुढील लोक पोषण मार्गदर्शनासाठी विशेष प्रगत असतात, ज्यापैकी ४४% म्हणतात की बदाम खरेदी करताना आरोग्य दावे आणि घटक पारदर्शकतेकडे लक्ष देतात. ही सवय वय ४५ वर्षांहून अधिक असलेल्या ग्राहकांमध्ये आणि दक्षिण भारतातील लोकांमध्ये सर्वाधिक स्पष्ट दिसते.

जशी भारतातील लोक नववर्षाच्या आरोग्य प्रवासाला सुरुवात करतात, वजन व्यवस्थापन, फिटनेस आणि सजग आहार या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करत, तशीच ही सर्व्हे दर्शवते की बदाम हे या उद्दिष्टांसाठी एक अत्यावश्यक घटक बनले आहेत. त्यांचा नैसर्गिक पोषकत्व, तृप्ती वाढवण्याची क्षमता आणि वजन नियंत्रणातील भूमिका त्यांना दैनंदिन दिनक्रमात सामावण्यास प्रभावी बनवते. सकाळच्या पहिल्या जेवणात किंवा नाश्त्याचा भाग म्हणून खाल्ले, कॅलिफोर्निया बदाम लोकांना त्यांच्या ठरावांशी सातत्य ठेवण्यात मदत करतात, ज्यामुळे निरोगी निवडी सुलभ, टिकाऊ आणि दैनंदिन जीवनात घट्ट रुजलेले होतात.



**नागपूरकरांनो मतदान अवश्य करा**

# रन फॉर व्होटच्या माध्यमातून जैन सैतवाळ संस्थेने संदेश दिला

**नागपूर :** अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेद्वारे व श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिर इतवारी, श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ महिला व युवा शाखा, श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर बाहुबलीनगर, श्री आदिनाथ दिगंबर जैन सैतवाळ मंदिर अंबानगर, अखिल भारतीय पुलक मंच परिवार, श्री दिगंबर जैन युवक मंडळ (सैतवाळ) व महिला शाखा, महावीर युथ क्लब, श्री महावीर गृहनिर्माण सहकारी संस्था, माझं महावीरनगर, सकल जैन समाज नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रन फॉर व्होट, रन फॉर युनिटी मॅराथॉनचे आयोजन रविवारी सकाळी महावीरनगर मैदानात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय महामंत्री नितीन नखाते यांनी, प्रास्ताविक श्रीकांत तुपकर यांनी केले. आभार प्रदर्शन उमेश फुलंबरकर यांनी केले.

अखिल भारतीय दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री नितीन नखाते यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे विदर्भ पूर्वचे उपाध्यक्ष दिलीप राखे, श्री दिगंबर जैन सेनगण मंदिराचे अध्यक्ष सतीश जैन पेंढारी, चंद्रकांत वेखंडे, किशोर मेंढे, मनोज बंड, अनिल जैन, दीपक पनवेलकर, राजेंद्र बंड, संस्थेचे नागपूर पुर्वचे अध्यक्ष श्रीकांत तुपकर, सचिव उमेश फुलंबरकर, दिलीप सावळकर, श्री जैन सहायता ट्रस्टचे सचिव सुभाष मचाले, श्री सैतवाळ जैन संघटन मंडळाचे कार्यवाह प्रकाश मारवडकर, संस्थेचे नागपूर पश्चिमचे अध्यक्ष सुनील फरसुले, महामंत्री अरविंद हनवंते, अखिल भारतीय पुलक मंच परिवार महावीर वार्ड नागपूरचे महामंत्री राजेश जैन उपस्थित होते.

अमोल भुसारी, अतुल महात्मे, मनोज मानेकर, नीलेश विटाळकर, अनुप गिल्लरकर, निलेश महात्मे, राहुल नखाते, नितिन रोहणे, सचिन येळवटकर होते. मॅरेथॉनला झेंडा दाखवून सतीश जैन पेंढारी, नितीन नखाते, चंद्रकांत वेखंडे, पंकज बोहरा, यांनी शुभारंभ केला. वर्षाच्या वरील ग्रुपमध्ये मॅरेथॉनमध्ये प्रथम दामोदर वानखेडे, द्वितीय विक्रांत मंगल, तृतीय गिरीश विटाळकर, चतुर्थ मनीष पिंजरकर, पाचवा अनिल इंदाने, वर्षाच्या कमी ग्रुपमध्ये प्रथम रुपेश सावळकर, द्वितीय निधी गिल्लरकर, तृतीय सान्वी विटाळकर अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेद्वारे आयोजित रन फॉर व्होट, रन फॉर युनिटी मॅरेथॉनच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत शत प्रतिशत मतदान करण्याचे आवाहन नागपूरकरांना करण्यात आले. निर्भय होऊन स्वयंस्फूर्तीने मतदान करून आपले कर्तव्य करण्याचे आवाहन या माध्यमातून करण्यात आले. नायलॉन मांजापासून स्वतःला दूर ठेवून वापर टाळण्याचे आवाहन, नागरिकांनी सहकार्य करून नायलॉन मांजावर बहिष्कार घालावा अशी कळकळीची विनंती मॅरेथॉनच्या माध्यमातून करण्यात आली. मोठ्या संख्येने समाजबंधू उपस्थित होते.

## राशीभविष्य

**मेष :** कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. नाहीतर फसवणूक होईल. आज नोकरीत पदोन्नती होईल. किंवा तुम्हाला पदोन्नतीची चांगली बातमी मिळेल. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**वृषभ :** विरोधक तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. व्यवसायातील समस्यांबद्दल अधिक जागरूक राहावे, अन्यथा नुकसान होऊ शकते.

**मिथुन :** आज दिवसाची सुरुवात चांगल्या बातम्यांनी होईल. व्यवसायात वेळेवर काम करा. प्रगतीसोबतच नफाही मिळेल. पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. जनतेकडून प्रचंड सहकार्य आणि पाठिंबा मिळेल.

**कर्क :** आजचा दिवस मिश्रित परिणामांचा असेल. खूप मेहनत केल्यानंतर यश मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाढेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे सरकारी मदतीने दूर होतील.

**सिंह :** आज प्रेमसंबंध अधिक दृढ होतील. महत्त्वाचे पद मिळाल्याने समाजात तुमचा प्रभाव वाढेल. कठोर परिश्रमामुळे मालमत्तेशी संबंधित कामात यश मिळेल.

**कन्या :** व्यवसायात लक्षणीय यश मिळेल. जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा आणि साथ मिळेल. सुरक्षा क्षेत्रात नोकरी शोधणाजया लोकांना विशेष यश मिळेल.

**तुळ :** आजचा दिवस नफा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात यशाचे संकेत मिळतील. तुम्ही नवीन काम सुरू करू शकता. नातेवाईक आणि जवळच्या मित्रांकडून सहकार्य मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** आज तुमचे अशांत असेल आणि कशाचाही उत्साह वाटणार नाही. तुम्हाला काम करण्याची इच्छा होणार नाही. तुम्ही आळसाला बळी पडू शकता. कामाच्या ठिकाणी आळस आणि निष्काळजीपणा टाळा.


**धनु :** आज तुम्हाला तुमच्या मुलांकडून मस्त, चांगली बातमी मिळेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन मित्र मिळतील. बौद्धिक काम करणाजया लोकांना मोठे यश आणि आदर मिळेल.

**मकर :** कामाच्या ठिकाणी सकारात्मक बदल दिसून येतील. काही काळापूर्वी अडकलेले इच्छित काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. व्यवसायात नवीन करार होऊ शकतात. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. तुमच्या नोकरीत बढती तर मिळेलच पण तुमच्या इच्छित ठिकाणी पोस्टिंगही होईल. कामाच्या संदर्भात नवीन कामाच्या योजना आखल्या जातील.

**मीन :** नोकरीत बदलीची शक्यता आहे. भविष्यात चांगले फायदे मिळण्याची शक्यता आहे. स्वतःवर विश्वास ठेवा. इतरांच्या बोलण्यात अडकू नका. अन्यथा फसगत होऊ शकते.

## शब्दकोडे क्रमांक २३२४



**आडवे शब्द :-**

१) धोंडामास, मलमास
५) धुणे
७) प्रगती, उमलणे, वाढ
९) श्रीमंत
११) चालू काळ
१२) कम्मळ
१३) बोजा, वजन
१४) दैव
१६) घोड्याचे तोंड, एक मराठी नाटक
१९) राष्ट्र
२१) केसांची लोंबती बट
२२) जिव्हाळा, माया
२३) मीठाची चव
२४) आशीर्वाद, उर्ध्व दिशा
२५) भूपती
२६) नगर
२८) पोपट
३०) लहान बाळाच्या हातातील कडे
३३) आजतागायत
३५) हस्त
३६) फळाचे साल
३९) कावळा
४०) लक्ष्मी नारायण
४२) विनाकारण
४३) व्यय
४४)रवाळ (तूप)
४५) पुष्कळ
४६) तुरुंग
४७) एक चतुर्थांश
४८) प्रश्न
५०) थंडगार हवेची लाट
५३) दरवाजा
५४) वणवा
५७) रात्र
५९) पळसाचा डिंक
६१) शेळीचे पिल्लू
६२) तजवीज
६३) एक तारवाद्य.

**उभे शब्द :-**

१) उर्मट, उद्धटभाषा
२) दया
३) बर्फाचा पर्वत
४) घोड्याच्या खूराला लावण्याची चंद्राकृती लोखंडी पट्टी
५) मीठ
६) लग्नाचा मुलगा
७) आकाशयान
८) गाल, कानाजवळचा भाग
१०) श्रीकृष्णाचे एक नाव
१५) मोठे, कुरुप (डोळे)
१६) निराश, हतबल
१७) माल साठविण्याची जागा
१८) नृत्यकलेचे दैवत
२०) लाज
२२) मौज,गंमत
२५) संतापी
२७) सीमा
२९) राबता, जाणेयेणे
३१) तारणपत्र
३२) स्वच्छ
३३) माला-माणसांचे जाणे-येणे
३४) लक्ष्मीचे एक नाव
३७) सुंदर तरुणी
३८) उत्कर्षाचा काळ
३९) अक्षरापुढची रेघ
४१) पहारेकरी
४४) मोठी घागर
४६) पाहिजे, वारा, वायू
४८) रस्ता
४९) एक मोठे चर्मवाद्य
५१) थेट, सरळ
५२) चांदी
५५) लाकूड छिलण्याचे एक हत्यार
५६) नको असता
५८) पाणी
६०) वाळवंट.

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# मेळघाटातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता कायम

## आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारात



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.11 )** – मेळघाट परिसरातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. अनेक शाळांमध्ये शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने वर्ग नियमितपणे होत नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत असून त्यांचे भविष्य धोक्यात येत असल्याची भावना पालक व ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. शिक्षण विभागाकडून या परिस्थितीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही होत आहे.

मेळघाटसारख्या दुर्गम व आदिवासीबहुल भागात शिक्षण हाच विकासाचा मुख्य आधार मानला जातो. मात्र जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची पदे वर्षानुवर्षे रिक्त राहिल्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळत नाही. अनेक शाळांमध्ये एकाच शिक्षकावर दोन ते तीन वर्गांचा भार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी घसरत चालली आहे. शिक्षकांच्या कमतरतेबरोबरच शाळांमधील मूलभूत सुविधांचाही मोठा अभाव आहे. अनेक ठिकाणी वर्गखोल्यांची दुरवस्था, अपुरी फर्निचर व्यवस्था, स्वच्छतागृहांची कमतरता तसेच पिण्याच्या पाण्याची गैरसोय अशा समस्या कायम आहेत. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर होत असून काही विद्यार्थी शाळा सोडण्याच्या मार्गावर असल्याचेही वास्तव आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासन विविध योजना राबवत असले तरी त्या प्रत्यक्षात कागदावरच मर्यादित राहत असल्याची भावना स्थानिकांमध्ये आहे. शिक्षक भरती प्रक्रिया रखडलेली असून रिक्त पदे तातडीने भरण्याची नितांत गरज आहे.

तसेच शाळांमधील मूलभूत सुविधा तत्काळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मेळघाटातील जिल्हा परिषद शाळांची स्थिती सुधारण्यासाठी शिक्षण विभागाने तात्काळ पावले उचलावीत, शिक्षकांची रिक्त पदे भरावीत आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी पालक, ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. अन्यथा आदिवासी विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### चिखलदरा तालुक्यातील शिक्षकांची स्थिती

चिखलदरा तालुक्यात शिक्षकांची एकूण मंजूर पदे 472 असून सध्या 358 शिक्षक कार्यरत आहेत. नुकतेच 50 कंत्राटी शिक्षक रुजू झाले आहेत. तरीही एकूण 69 पदे अद्याप रिक्त असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी भटेसिंग गिरासे यांनी दिली.

### काँग्रेसकडून सरकारवर टीका

निवडणुकांच्या काळात राज्यात देवेंद्र फडणवीस व केंद्रात नरेंद्र मोदी सरकार विकासाचे मोठे दावे करते. मात्र प्रत्यक्षात मेळघाटातील आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी पुरेशी व्यवस्था नाही. मग हा विकास कुणासाठी?

**सहदेव बेलकर,**
**तालुकाध्यक्ष, काँग्रेस कमिटी, चिखलदरा.**

# यापूर्वीही बसले होते धामणगाव रेल्वेला भूकंपाचे धक्के

## सौम्य धक्क्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण




**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि. 11 )** – धामणगाव रेल्वे येथील कृष्णा नगर व परिसरातील काही भागांमध्ये आज भूकंपाचा सौम्य धक्का जाणवल्याची माहिती समोर आली आहे. याआधीही या भागात अशा स्वरूपाचे सौम्य धक्के जाणवले होते. अचानक जमिन हलल्यासारखे वाटल्याने अनेक नागरिक क्षणभर घाबरले. मात्र हा धक्का अल्पकालीन व सौम्य स्वरूपाचा असल्याचे नागरिकांनी सांगितले.

घटनेनंतर काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तथापि, या धक्क्यामुळे कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याची नोंद नाही. प्रशासनाकडूनही नुकसान झाल्याची कोणतीही अधिकृत माहिती प्राप्त झालेली नसल्याचे समजते.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते अक्षय जोशी यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, हा भूकंपाचा सौम्य व क्षणिक धक्का होता, नागरिकांनी घाबरून जाऊ नये. सध्या कोणताही धोका नाही, मात्र भविष्यात सतर्क राहणे आवश्यक आहे.

स्थानिक नागरिकांनीही धक्क्याची अनुभूती झाल्याचे सांगितले असून, सध्या परिसरात परिस्थिती पूर्णपणे शांत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संयम राखावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# सावित्री-जिजाऊ दशरात्रोत्सव विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि. 11 )** – जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सावित्रीङ्कजिजाऊ दशरात्रोत्सव 3 ते 12 जानेवारी दरम्यान मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दहा दिवसांत सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्वरूपाचे विविध उपक्रम राबविण्यात आले.

दशरात्रोत्सवाची सुरुवात 3 जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त करण्यात आली. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेविकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवमती राजश्री गावंडे (संचालिका, ज्ञानपीठ इंग्लिश कॉन्व्हेंट स्कूल) होत्या. प्रमुख उपस्थितीत जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष शिवमती सीमा बोके, ज्येष्ठ मार्गदर्शिका मीना कोल्हे, प्रतिभा अढाऊ, प्रियांका मालठाणे, रूपाली देवगिरे, सुमित्रा ढगे, गीता येऊल व संगीता तुरखडे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कार्याध्यक्ष पल्लवी अढाऊ यांनी केले. संचालन तालुका सचिव स्वाती लहाने यांनी, तर आभारप्रदर्शन सारिका मानकर यांनी केले. हा कार्यक्रम जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष सारिका मानकर यांच्या निवासस्थानी पार पडला.

4 जानेवारी रोजी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांचा जन्मदिवस कराओके गीतगायनाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. 5 जानेवारी रोजी महिलांनी वनभोजनाचा आनंद घेतला, तर 6 जानेवारी रोजी 'वन मिनिट गेम शो' आयोजित करण्यात आला.

7 जानेवारी रोजी दहिगाव रेचा (ग्रामीण) येथे दृष्टीहीन महिलांना साड्यांचे वाटप व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. 8 जानेवारी रोजी हिरापूर येथे ग्रामशाखा स्थापन झाली. 9 जानेवारी रोजी रजनीताई काळमेघ यांच्या निवासस्थानी समारोपीय कार्यक्रम पार पडला. या उपक्रमांमधून महिलांमध्ये सामाजिक बांधिलकी, आत्मभान व संघटनात्मक एकोपा निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.



# आक्रोश जनशक्ती संघटनेचा चौथा वर्धापन दिन

**वरुड, ( दि. 11 )** – आक्रोश जनशक्ती संघटनेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त सनराईज प्राथमिक शाळा, वरुड येथे भावनिक व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुशील बेले यांनी ज्या शाळेत शिक्षण घेतले, त्याच शाळेत हा कार्यक्रम झाल्याने त्यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संचालक व शिक्षक जावडे सर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत संघटनेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. मुख्याध्यापिका मीना पांडे मॅडम यांनी शिक्षक-विद्यार्थी नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्रवक्ते व माजी सैनिक अरविंद भाऊ गजभिये यांनी संघटनेच्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक केले.

सुशील बेले यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी भावनिक शब्दांत मांडताना शिक्षकांच्या संस्कारांचा उल्लेख केला. कार्यक्रमात सहकारी महेंद्र गजभिये यांचा जन्मदिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पेन व परीक्षा पेपर पॅडचे वाटप करण्यात आले. साधेपणात साजरा झालेला हा कार्यक्रम शाळा, शिक्षक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्य यांचे अतूट नाते दर्शविणारा ठरला.

## नफ्याचे आमिष; 17.40 लाखांची ऑनलाइन फसवणूक

**अमरावती** – शेअर बाजारात कमी वेळेत मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत सायबर भामट्यांनी रतन इंडिया कंपनीत कार्यरत 39 वर्षीय कर्मचाऱ्याची तब्बल 17 लाख 40 हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोन अनोळखी मोबाईल क्रमांकधारकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनूप साहेब सिंग (वय 39), रा. कैलास नगर, साकी विहार रोड, पवई (मुंबई) असे फसवणूकग्रस्ताचे नाव आहे. 15 डिसेंबर 2025 रोजी त्यांना एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. कॉल करणाऱ्याने 'रुद्र सिक्युरिटी सर्व्हिस ग्रुप'मध्ये सहभागी करून घेत शेअर बाजारातून मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या सूचनेनुसार 'रुद्र सिक्युरिटी सर्व्हिस' या अ?पद्वारे अनूप सिंग यांनी टप्प्याटप्प्याने 17.40 लाख रुपयांची गुंतवणूक केली. सुरुवातीला नफा दिसत असल्याचा आभास निर्माण करण्यात आला. मात्र काही दिवसांनी रक्कम 'लॉक' झाली आणि पैसे काढण्याचा प्रयत्न केल्यावर कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी माहुली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून सायबर पोलिसांकडून पुढील तपास सुरू केला आहे.

# शालेय कार्यक्रमात आमदारांकडून शिवीगाळ

## पोलिसांत तक्रार ; आंदोलक गोपाल भालेराव यांचा गंभीर आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि. 11 )** – शालेय कार्यक्रमासारख्या पवित्र व सार्वजनिक ठिकाणी भर सभेत आमदारांकडून अश्लील व शिवीगाळयुक्त भाषा वापरण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, याप्रकरणी आंदोलक कार्यकर्ते गोपाल भालेराव यांनी आमदार प्रवीण तायडे यांच्याविरोधात अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक तसेच चांदूर बाजार पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

धानोरा (पूर्णा) येथील रहिवासी असलेले गोपाल भालेराव हे शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी वर्गाच्या हक्कांसाठी कायदेशीर मार्गाने आंदोलने करीत असतात. चांदूर बाजार तालुक्यातील सुमारे 11 हजार शेतकऱ्यांना अद्याप अतिवृष्टीची नुकसानभरपाई मिळालेली नसल्याने, त्या मागणीसाठी त्यांनी 31 डिसेंबर 2025 रोजी आमदारांच्या कार्यालयासमोर आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर 3 जानेवारी 2026 रोजी हिरुळ (पूर्णा) येथील सावित्रीबाई फुले विद्यालयात आयोजित कार्यक्रमात आमदार प्रवीण तायडे यांनी भालेराव यांचा उल्लेख करत अत्यंत अपमानास्पद व अश्लील शब्दांचा वापर केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या कार्यक्रमास लहान विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते. भर सभेत 'भडव्या, हरामखोर, साल्या' अशा शब्दांचा वापर करून जाणीवपूर्वक मानहानी करण्यात आल्याने मानसिक त्रास झाल्याचे भालेराव यांनी तक्रारीत नमूद केले आहे. शालेय परिसरात अशा प्रकारची भाषा वापरणे निंदनीय असून त्यामुळे सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी भादंवि कलम 294, 504 तसेच आवश्यक असल्यास 506 अन्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. घटनेचे व्हिडिओ व ऑडिओ पुरावे उपलब्ध असल्याचा दावाही तक्रारीत करण्यात आला आहे. संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून तीव्र टीका होत आहे. दरम्यान, आमदार प्रवीण तायडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

# ग्रामीण लुटताहेत 'रोडगा पार्टी'चा आनंद

## पौष महिन्यात प्रत्येक रविवारी रोडग्याचे पारंपरिक जेवण









**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट,( दि. 11 )** – विदर्भातील खास खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग असलेला रोडगा पौष महिन्यात ग्रामीण भागात विशेष आकर्षण ठरत आहे. गव्हाच्या कनकीपासून बनविला जाणारा हा पारंपरिक पदार्थ खवय्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असून, पौष महिन्यातील प्रत्येक रविवारी रोडग्याच्या जेवणाचा आनंद घेण्यासाठी शेतशिवारात गर्दी होताना दिसत आहे. गावोगावी भरणाऱ्या यात्रांमध्ये तसेच मंदिरांतील नवसपूर्तीसाठी होणाऱ्या भोजनावळीत रोडग्यांना मानाचे स्थान दिले जाते.

वऱ्हाडात नवस बोलला की त्याची फेड रोडगा वाहूनच केली जाते, अशी जुनी परंपरा आहे. त्यासाठी शेतात किंवा आंब्याच्या झाडाखाली गोवऱ्यांचे खांड पेटवून 'जगर' मांडला जातो. त्या गरम राखेत रोडगे भाजले जातात. एकीकडे खमंग रोडगे तयार होतात, तर दुसरीकडे भट्टीवर पूर्ण वांग्याची मसालेदार भाजी केली जाते. पौष महिन्यातील प्रत्येक रविवारी ग्रामीण भागात शिवारातील हे दृश्य पाहायला मिळते. खरीप हंगाम आटोप्यात येत असून रब्बी हंगामातील पेरण्या पूर्ण झाल्याने शेतकरी तुलनेने मोकळा असतो. त्यामुळे शेतातच रोडग्याच्या जेवणाचा बेत आखला जातो. विशेष म्हणजे शहरातील चाकरमानी मंडळीही एक दिवस खास राखून गावात येतात व अस्सल वऱ्हाडी मेनूचा आस्वाद घेतात. रोडगा, वांगे-बटाट्याची तर्रीची भाजी, कढी, तुरीच्या डाळीचे वरण आणि त्यावर तूप असा बेत सर्वांना भावतो. हल्ली गोधन कमी झाल्याने गोवऱ्यांची कमतरता भासते. त्यामुळे पाणगे बनवून त्याचे छोटे काप करून तेलात तळले जातात. त्याला 'बिट्टचा' म्हणतात. यावरच अनेक ठिकाणी रोडगे भाजले जातात. काही ठिकाणी रोडगे मटणासोबतही खाल्ले जातात. बहिरम यात्रेत मिळणाऱ्या हंडीतील मटणासोबत रोडगे खाण्याचा बेत खास मानला जातो.

### गूळ व तूप घालून बनविलेले जाते लाडू

रोडग्याचे जेवण केल्यानंतर तहान अधिक लागते, त्यामुळे जेवणानंतर भरपूर पाणी प्यावे लागते. रोडग्यांचा चुरा करून त्यात गूळ व तूप घालून खास लाडूही तयार केले जातात. एकूणच पौष महिन्यात ग्रामीण भागात रोडगा पार्टीचा उत्साह शिगेला पोहोचला असून, परंपरा आणि चवीचा संगम अनुभवण्यासाठी ग्रामस्थ आनंदाने या भोजनाचा आस्वाद घेत आहेत.

# बहिरम बाबा यात्रेनिमित्त 'हिंद केसरी' शंकरपट स्पर्धेचे भव्य आयोजन

## 11 लाखांच्या बक्षिसांसाठी 18 ते 20 जानेवारी दरम्यान रंगणार थरार





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.11 )** – सातपुडा पर्वतरांगांतील प्रसिद्ध श्री क्षेत्र बहिरम बाबा यात्रा महोत्सव 2026 निमित्त विदर्भातील सर्वप्रथम 'हिंद केसरी' मैदान आमदार हिंद केसरी जंगी शंकरपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा 18, 19 व 20 जानेवारी 2026 रोजी बहिरम बाबा यात्रा परिसरात, तालुका चांदूर बाजार येथे पार पडणार आहे. आमदार प्रवीण तायडे यांच्या पुढाकारातून होत असलेल्या या भव्य आयोजनात तब्बल 11 लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली असून, विदर्भातील नामवंत धुरकरी सहभागी होणार असल्याने स्पर्धेबाबत मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

स्पर्धेद्वारे बैलगाडा शर्यतीच्या परंपरेला नवे व्यासपीठ मिळणार असून, सांस्कृतिक वारसा जपण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. प्रत्येक गटातील विजेत्या धुरकऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन खासदार डॉ. अनिल बोंडे आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री प्रवीण पोटे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून आमदार रवी राणा, आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, आमदार चंदू यावलकर यांची उपस्थिती लाभणार आहे. प्रशासकीय स्तरावरून उपविभागीय अधिकारी बळवंत आखराव, पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. शुभम कुमार, तहसीलदार सोनल सूर्यवंशी, ठाणेदार महेंद्र गवई यांची उपस्थिती राहणार आहे. ही स्पर्धा केवळ शर्यत न राहता धार्मिक, सांस्कृतिक आणि क्रीडात्मक परंपरांचे संगमस्थान ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. बैलगाडा शर्यतीचे सर्व चाहते व धुरकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणी व माहितीसाठी आयोजक समिती, बहिरम बाबा यात्रा महोत्सव, चांदूर बाजार यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### स्पर्धेचे गट व बक्षिसे

**सामान्य गट**

प्रवेश फी : 3,000

बक्षिसे : बुलेट, बटालियन, युनिकॉर्नसह 17 आकर्षक बक्षिसे

**'क' गट**

प्रवेश फी : 2,000

प्रथम बक्षीस : एचएफ डिलक्स मोटरसायकल

एकूण 18 बक्षिसे

**गाव गट (अचलपूर व चांदूर बाजार)**

प्रवेश फी : 700

प्रथम बक्षीस : 21,000 रोख

इतर अनेक रोख बक्षिसे

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक



# मुलींनीच केलं लग्न!

बिहारमधील सुपौल जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या या दोन मुली 'सोशल मीडिया'वर भेटल्या. त्यांनी नंबरची देवाणघेवाण केली आणि बोलू लागल्या. एकमेकींच्या प्रेमात पडल्या आणि नंतर लग्न केले.बिहारमधील सुपौल जिल्ह्यातील एका अनोख्या लग्नाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. या लग्नाबद्दल ऐकून लोक खूप आश्चर्यचकित झाले आहेत. या लग्नाची चर्चा केवळ सुपौलमध्येच नाही, तर आजूबाजूच्या परिसरातही होत आहे आणि त्याचे कारण म्हणजे हे मुलगा आणि मुलीतील लग्न नव्हते, तर दोन मुलींमधील लग्न होते. त्यांनी साक्षीदार म्हणून गॅस स्टोव्हसह सात फेरे घेतले आणि नंतर एका मंदिरात लग्न समारंभ पूर्ण केला.

२१ वर्षीय पूजा आणि १८ वर्षीय आरती प्रेमात पडल्या. त्या इंस्टाग्रामवर भेटल्या आणि नंबरची देवाणघेवाण केली. त्यांनी दोन वर्षांपूर्वी प्रथम बोलणे केले आणि तेव्हापासून त्यांची प्रेमकहाणी सुरू आहे. पूजा आणि आरती म्हणतात,त्यांना मुलांमध्ये रस नाही, म्हणून त्यांनी एकमेकींशी लग्न केले. पूजा आणि आरतीने साक्षीदार म्हणून गॅस स्टोव्हसह सात फेरे घेतले आणि नंतर त्रिवेणीगंज मेळा मैदानावरील मंदिरात लग्न केले.आता लग्न झालेल्या पूजा आणि आरती 'सोशल मीडिया'वर भेटल्या; परंतु त्या दोघीही एकाच मॉलमध्ये काम करत होत्या. हळूहळू त्यांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. पूजा आणि आरती म्हणतात, आम्ही भाड्याच्या खोलीत एकत्र राहू लागलो. त्या म्हणतात, आम्ही जोडप्यासारखे एकत्र राहू लागलो. आमच्या दोघींचीही कुटुंबं या लग्नासाठी अजिबात तयार नव्हती, म्हणून आम्ही आधी लग्न केले आणि नंतर आमचे फोटो 'सोशल मीडिया'वर अपलोड केले.

## कॅलिडोस्कोप

# मांसाहारी प्रसाद?

पूजा अर्चा करताना किंवा उपवास करताना सात्विक आहार घ्यायचा असतो, असे आपण आजवर ऐकले आणि वाचले असेल. परंतु तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल, की भारतातील काही मंदिरात मांसाहारी प्रसाद दिला जातो. भारतात अनेक मंदिरांमध्ये देवीला किंवा ग्रामदैवताला मांसाहार अर्पण केला जातो. या मागे धार्मिक आणि सांस्कृतिक कारणे आहेत.

*** मुनियंडी स्वामी मंदिर, तामिळनाडू**

तामिळनाडूतील मदुराई जिल्ह्यातील वडक्कम पट्टी या लहान गावातील मुनियंडी स्वामी मंदिरात भगवान मुनियादी (भगवान शिवाचे अवतार मुनिश्वर नावाने ओळखले जातात) यांची पूजा केली जाते. दरवर्षी येथे तीन दिवसांचा वार्षिक उत्सव साजरा केला जातो. या मंदिरात प्रसाद म्हणून चिकन आणि मटण बिर्याणी दिली जाते. लोक सकाळी बिर्याणी खाण्यासाठी मंदिरात गर्दी करतात.

*** विमला मंदिर, ओडिशा**

देवी विमला (दुर्गा मातेचे एक रूप) या देवीला पूजेदरम्यान मांस आणि मासळीचा नैवेद्य दाखवला जातो. हे मंदिर ओडिशाच्या पुरी स्थित जगन्नाथ मंदिर परिसरात आहे आणि यास शक्तीपीठांमध्ये गणले जाते. दुर्गा पूजेत मंदिरातील पवित्र मार्कंडा तलावात मासे पकडले जातात आणि देवीला अर्पण केले जातात. सकाळी आधी बळी दिलेल्या बकऱ्याचे मटण शिजवून देवीला अर्पण केले जाते. हे दोन्ही पदार्थ बळीची प्रक्रिया पाहणाऱ्यांना प्रसाद म्हणून वाटले जातात. भगवान जगन्नाथ यांचे दरवाजे उघडलेले नसतात तेव्हा हे केले जाते.

*** टारकुलहा देवी मंदिर, उत्तर प्रदेश**

उत्तर प्रदेशातील गोरखपूरमधील टारकुलगा देवी मंदिरात दरवर्षी खिचडी मेळा भरतो. हे मंदिर लोकांची मनोकामना पूर्ण करण्यासाठी प्रसिद्ध आहे. देशभरातील लोक चैत्र नवरात्रीत येथे येतात. नवस म्हणून देवीला बकऱ्याचा बळी देतात. याचे मांस मातीच्या भांड्यात शिजवले जाते. आणि भक्तांना प्रसाद म्हणून वाटले जाते.

*** पारसिनिक कडवु मंदिर, केरळ**

पारसिनिक कडवु मंदिर भगवान मुथप्पन यांना समर्पित आहे. भगवान मुथप्पन हे कलियुगात जन्मले असून, ते विष्णू आणि शिवाचा अवतार मानले जातात. दक्षिण भारतात त्यांना अनेक नावांनी ओळखले जाते आणि त्यांची पूजा केली जाते. येथे प्रसादात भाजलेली मासळी आणि ताडी भगवान मुथप्पन यांना अर्पण केली जाते. असे केल्याने मनोकामना पूर्ण होते, अशी श्रद्धा आहे. हा प्रसाद नंतर भक्तांना दिला जातो.

***कालीघाट, पश्चिम बंगाल**

हा देशातील ५१ शक्तीपीठांपैकी एक आहे आणि २०० वर्षे जुने देवस्थान आहे. येथे बहुतांश भक्त देवी कालीला प्रसन्न करण्यासाठी बकऱ्याचा बळी देता. बळी दिल्यानंतर हे मांस शिजवले जाते आणि भक्तांना प्रसाद म्हणून दिले जाते.



*** कामाख्या मंदिर, आसाम**

कामाख्या मंदिर प्रसिद्ध आहे. ते एक प्रसिद्ध शक्तीपीठांपैकी एक आहे. येथे माँ कामाख्या देवीची पूजा तांत्रिक शक्तींसाठी केली जाती. हे मंदिर आसामच्या नीलाचल पर्वतात आहे. नैसर्गिकदृष्ट्या सुंदर प्रांतात आहे. येथे देवीला दोन प्रकारचा नैवेद्य दिला जातो. एक शाकाहारी आणि दुसरा मांसाहारी. हे दोन्ही नैवेद्य विना कांदा-लसूण बनवले जातात. मांसाहारी प्रसादात बकऱ्याचे मटण असते. ज्यास देवीला अर्पण करून नंतर प्रसाद वाटला जातो. कधी माशाची चटणी तयार केली जाते. हा नैवेद्य दुपारी १ ते २ या दरम्याने देवीला चढवला जातो. या वेळी मंदिराचे मुख्यद्वार बंद असते.

*** तारापीठ, पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालच्या बीरभूम जिल्ह्यातील तारापीठ मंदिर दुर्गा भक्तांमध्ये खूपच प्रसिद्ध आहे. येथेही लोक देवीला मांसाचा नैवेद्य अर्पण करतात. या वेळी देवीला मद्य देखील चढवले जाते. नंतर हा प्रसाद म्हणून लोकांना वाटला जातो.

*** दक्षिणेश्वर काली मंदिर, पश्चिम बंगाल**

दक्षिणेश्वर काली मंदिर हे पश्चिम बंगाल येथील एक प्रसिद्ध शक्तिपीठ आहे. या मंदिरात देवीला नैवेद्यात मासळी दिली जाते. नंतर पूजा झाल्यानंतर ही भक्तात वाटली जाते; मात्र या मंदिरात कोणत्याही प्राण्याची बळी दिला जात नाही.

# पायांमुळे होते लाखोंची कमाई

कोणाच्या डोक्यातून कोणती सुपीक कल्पना निघेल याचा नेम नाही. आजच्या जगात कोणाला दोन वेळचं अन्न मिळत नाही तर कोणी अचानक मालामाल होऊन जातो. आता पायात घातलेल्या, दुर्गंधी येणाऱ्या मोज्यांचं आणि बुटांना कोणी विचारेल तरी का? पण एक मुलगी असे दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे ऑनलाईन विकते आहे. रोक्सी साईक्स असं या महिलेचं नाव आहे. दुर्गंधी येणारे मोजे आणि बूट विकून ती वर्षाला एक लाख पाउंड म्हणजे ७३ लाख रूपये कमावते. एका इंस्टाग्राम पेजवरून या अनोख्या व्यवसायाची सुरूवात झाली. दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे विकायचा विचार कोणाच्याही मनात येणार नाही. पण रोक्सीला ही कल्पना सुचली. सुंदर पायांमुळे ती हे करू शकली. रोक्सीने इन्स्टाग्राम अकांउट सुरू केलं. पायांवर प्रेम करणारे किती लोक आहेत हे तिला जाणून घ्यायचं होतं. एका महिन्याच्या आत तिला दहा हजारांपेक्षा जास्त फॉलोअर्स मिळाले. मग काही व्यापाऱ्यांनी तिच्याशी संपर्क केला. मोज्यांच्या एका जोडीसाठी २० पाउंड आणि बुटांच्या जोडीसाठी २०० पाउंड देण्याचं ठरलं आणि रोक्सीला मार्ग मिळाला. तिचा व्यवसाय वाढत गेला. रोक्सी महिन्याला ८००० पाउंड कमावते. भारतीय चलनात याचं मूल्य साडेसात लाख रूपये होतं. पायांच्या माध्यमातून कमाईचे मार्ग मिळवण्याचे धडे रोक्सी काही मॉडेल्सना देते आहे. रोक्सीला आता आपल्या भविष्याची अजिबात चिंता नाही.





# जंगल श्वास घेतंय!

झाडं सजीव असतात. तीही श्वास घेतात, ऑक्सिजन बाहेर सोडतात. कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेतात. पण या प्रक्रियेत झाडं श्वासोच्छवास करताना दिसत नाहीत. पण कॅनडामधल्या सेक्रे कोइर भागतलं जंगल अचानक श्वास घेऊ लागलं. झाडंझुडुपं हलू लागली. हे सगळं एका व्हिडिओमध्ये रेकॉर्ड झालं. हा व्हिडिओ व्हायरल झाला. जंगलाला अशा प्रकारे श्वास घेताना बघून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. या व्हिडिओमध्ये जंगलाखालची जमीन हलत असल्याचं दिसून येत आहे. यामुळे झाडं श्वास घेत असल्याचा भास आपल्याला होतो. आता प्रत्यक्षात जंगल अशा प्रकारे श्वास घेऊ शकतं का? तर नाही. मग काय घडलं असावं? हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शास्त्रज्ञांची टीम या ठिकाणी रवाना झाली. त्यांनी शोध घेतला. त्यांच्या असं लक्षात आलं की सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होत आहे. सोसाट्याचा वारा सुटल्यानंतर झाडाचा वरचा भाग हलू लागला. सोसाट्याचा वारा सुटल्यावर पृथ्वीवरची माती नरम पडते. झाडांची मुळं मातीशी घट्ट जोडलेली असतात. पण वाऱ्यामुळे माती नरम पडल्यामुळे मुळं थोडी कमकुवत होतात. वारा सुटल्यानंतर खोड, बुंदे, फांद्या, पानं सगळं जोरात हलू लागतं. त्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होतो, असा खुलासा शास्त्रज्ञांनी केला आहे. सोशल मिडियावर कोणता व्हिडिओ व्हायरल होईल याचा नेम नसतो. पण जंगल श्वास घेत असल्याच्या या व्हिडिओने सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला.




# ...मग होतो 'डिजिटल ब्लॅकाऊट'!

बेळगाव जिल्ह्यातील हलगा गावाने डिजिटल युगात एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. दररोज संध्याकाळी ठीक सात वाजता ग्राम पंचायत कार्यालयातून सायरन वाजतो आणि संपूर्ण गाव दोन तासांसाठी 'डिजिटल ब्लॅकआउट'मध्ये बुडते. टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप, टॅब्लेट सर्व स्क्रीन्स बंद होतात. रात्री नऊ वाजता दुसरा सायरन वाजतो आणि जीवन पुन्हा सामान्य होते.

ही मोहीम विशेषतः मुलांच्या शिक्षणासाठी आहे.'एसएसएलसी' परीक्षा आणि अभ्यासाच्या तयारीत मुले मोबाईल-टीव्हीच्या व्यसनामुळे विचलित होतात. आता हे दोन तास मुले पूर्ण एकाग्रतेने अभ्यास करतात. काही मुले ग्रुप स्टडी करतात, तर काही घरातील कामात मदत करतात. पालकही मुलांना साथ देतात. स्वतःही स्क्रीनपासून दूर राहतात.

गावातील महिलाही उत्साहाने सहभागी होताक. पूर्वी संध्याकाळी टीव्ही मालिका पाहण्यात वेळ जात होता. आता त्या कुटुंबाशी बोलतात, घरात गप्पा मारतात किंवा इतर कामे करतात. स्थानिक रहिवासी रोहित यल्लुरकर म्हणतात, या दोन तासांमुळे मुलांची एकाग्रता वाढली आहे. अभ्यासात खूप फरक पडतो आहे. ही कल्पना महाराष्ट्रातील मोहित्यांचे वडगाव गावातील यशस्वी मोहिमेपासून प्रेरित आहे. तिथेही असाच सायरन आणि डिजिटल बंदीचा नियम आहे. हलग्यातील ग्रामस्थांनी हे पाऊल उचलून मुलांचे भविष्य उज्ज्वल करण्याचा निर्धार केला आहे.

जास्त स्क्रीन टाइम मुलांसाठी धोकादायक आहे. शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी हा उपक्रम गरजेचा होता. गावकऱ्यांचा हा स्वेच्छेचा निर्णय पूर्ण गावाने अवलंबला आहे. आता संध्याकाळी गावात शांतता आणि अभ्यासाचे वातावरण असते. कुटुंबे एकत्र येतात, गप्पा मारतात. हा उपक्रम इतर गावांना आणि शहरांना प्रेरणा देत आहे. डिजिटल व्यसनावर मात करण्याचा हा सोपा पण प्रभावी मार्ग खरोखरच कौतुकास्पद आहे.

# घरात चूलच नाही?

शेकडो सालापासून भारतीय गावे त्यांच्या साधेपणासाठी आणि परंपरासाठी ओळखले जातात,परंतु आताकाळ बदलत आहे. सोयी-सुविधा वाढल्या आहेत. आजही काही गावांमध्ये अनोख्या परंपरा सर्वांचे लक्ष आकर्षित करतात. असे एक गाव गुजरातमध्येही आहे. या गावातील कोणत्याही घरात चूल नाही, तरी सर्वजण एकत्र बसून जेवतात आणि कोणीही उपाशी राहत नाहीत.

या गावाचे नाव चंदंकी असे आहे. सुमारे १००० लोकसंख्येच्या या गावात सामुदायिक स्वयंपाकघराची अनोखी परंपरा चालत आली आहे. या संपूर्ण गावात जेवण रोज एकाच जागी तयार केले जाते. सर्व गावकरी एकत्र येऊन जेवतात. ही व्यवस्था केवळ जेवणापर्यंत मर्यादित नाही. तर गावच्या एकता आणि सामाजिक सद्भावाचे एक प्रतिक आहे. गावातील एका ज्येष्ठ व्यक्तीच्या मते, अनेक वर्षांपूर्वी गावातील तरुण नोकरी आणि पोटापाण्याच्या निमित्ताने शहरात आणि परदेशात जाऊन राहू लागलेतेव्हा गावातील म्हाताऱ्या लोकांची संख्या वाढली. यामुळे एकत्र येऊन जेवण तयार करणे आणि एकत्र पंगतीला बसणे सुरू झाले. बऱ्याच काळानंतर ही परंपरा कायम सुरूच ठेवण्यात आली आहे. आज ही या गावाची ओळख बनली आहे.

गावातले सुमारे १०० नागरिक रोज जेवण शिजवण्याची जबाबदारी वाटून घेतात. त्यामुळे कोणावर ओझे पडत नाही. डाळ, भाज्या, पोळ्या सर्वजण एकत्र येऊन तयार करतात. तसेच सणासुदीला आणि खास निमित्ताने वेगवेगळी पक्वानेदेखील तयार केली जातात. येथे कोणी एकटे नाही. चंदंकीचे सामूहिक किचन आता पर्यटकांसाठीदेखील एक आकर्षणाचे केंद्र बनले आहे. येथे येणारे पाहुणे केवळ जेवणाचाच नव्हे तर गावातील संस्कृती, एकता आणि एकजुटीचाही अनुभव घेतात. चंदंकी गावातील लोकांच्या मते, येथे कोणी एकटे नाही. एकमेकांच्या सुख आणि दुःखात साथ देण्याची परंपरा पाळत या संपूर्ण गावाने गावालाच एका कुटुंबात बांधले आहे.



# एकच गर्भ वाढला दोन गर्भाशयांत

देवकीने कृष्णाला जन्म दिला. पण यशोदेने त्याला आईचं प्रेम दिलं. त्यामुळे भारतात देवकी आणि यशोदा ही संकल्पना आहे. एका आईने पोटात वाढवलेल्या बाळाला दुसरी आई यशोदा बनून प्रेम देते. पण अमेरिकेत विज्ञानाच्या मदतीने चमत्कार घडला आहे. इथे दोन आयांनी एकच गर्भ आपल्या पोटात वाढवला आणि बाळाला जन्म दिला. हे इथल्या समलैंगिक जोडप्याचं बाळ आहे. दोन महिलांच्या गर्भात वाढलेलं हे जगातलं पहिलंच बाळ आहे. त्यामुळे ही घटना ऐतिहासिक मानली जात आहे. आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या मदतीने या जोडप्याने बाळाला जन्म दिला. कल्पनातीत वाटणारी ही घटना प्रत्यक्षात आणण्यासाठी अमेरिकेतल्या डॉक्टरांनी खूप मेहनत घेतली. या जोडप्यातल्या एका महिलेच्या अंडाणूंचं शूक्राणूदात्याच्या शूक्राणूंसोबत प्रयोगशाळेत मिलन घडवण्यात आलं. यानंतर हे भ्रूण या जोडप्यातल्या एका महिलेच्या गर्भात सोडण्यात आलं. काही काळानंतर हे भ्रूण दुसऱ्या महिलेच्या गर्भात सोडण्यात आलं. त्यानंतर या महिलेने बाळाला जन्म दिला. अॅश्ले आणि ब्लिस कॉल्टर असं या पालक जोडप्याचं नाव आहे. २०१५ मध्ये त्या दोघी विवाहबद्ध झाल्या. या दोन्ही महिलांना स्वतःचं पोटचं बाळ हवं होतं. पण समलैंगिक असल्याने ते शक्य नव्हतं. त्यामुळे त्यांनी आयव्हीएफ तंत्रज्ञानाची मदत घेतली. ३६ वर्षांच्या ब्लिसने आपले अंडाणू दिले. शूक्राणूंसोबत फलन झाल्यानंतर गर्भ ब्लिसच्या गर्भात सोडण्यात आला. काही काळानंतर २८ वर्षांच्या अॅश्लेच्या गर्भात हेच भ्रूण सोडण्यात आलं. या वर्षी जून महिन्यात त्यांनी मुलाला जन्म दिला. स्टेटसन असं या मुलाचं नाव आहे. या प्रक्रियेसाठी ८५०० डॉलर्स गइतका खर्च आला. तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे या दोन्ही महिलांना पोटात बाळ वाढवण्याचं सुख मिळालं.



# पकडून लावले लग्न!

बिहारमधील भागलपूर जिल्ह्यात एका जोडप्याला चोरून-लपून भेटताना गावकऱ्यांनी पकडले आणि त्यांना लग्न करण्यास भाग पाडले. हे जोडपे गेल्या पाच महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये होते आणि प्रेयसीने प्रियकराला रात्री भेटण्यासाठी आमंत्रित केले होते. गावकऱ्यांना या भेटीची कल्पना आली. त्यांनी दोघांना एकत्र असताना पकडले आणि नंतर त्यांचे लग्न लावले.

ही घटना कहलगाव पोलिस ठाणे परिसरातील शिवनारायणपूर अंतर्गत येणाऱ्या ज्योतिपूर गावात घडली. मुलीने मुलाला रात्री भेटण्यासाठी आमंत्रित केले होते. गावकऱ्यांना त्यांच्या भेटीची माहिती मिळाली. त्यांनी त्यांना एकत्र पकडले आणि नंतर त्यांना एका खोलीत बंद केले. गर्दी जमली आणि परिस्थिती आणखी बिकट झाली. अखेर गावकऱ्यांनी जोडप्याचे हिंदू रितीरिवाजांनुसार लग्न लावून दिले. लग्नापूर्वीमुलगा, मुलगी आणि दोन्ही बाजूंच्या कुटुंबातील सदस्यांना आमंत्रित करण्यात आले होते. नंतर लग्न समारंभपूर्वक पार पडले. मुलगा सुरुवातीला लग्न करण्यास नाखूष होता परंतु सार्वजनिक दबावानंतर त्याने होकार दिला. नंतर त्याच रात्रीदोघांचे मंदिरात लग्न लावण्यात आले. प्रियकर राजीव कुमारने सांगितले, तो आणि पूजा गेल्या पाच महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये होते. कॉलेजला जाताना त्यांची भेट झाली होती.



## क्षुल्लक कारणावरुन
# शेजाऱ्याचा खून

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

गेल्या काही दिवसांपासून हत्याकांडाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून गुन्हेगारांच्या आक्रमकतेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. इमामवाडा पोलिस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर तीन गुन्हेगारांनी एका व्यक्तीचा क्षुल्लक कारणावरुन खून केला. ही घटना शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. मंगल मांगीया कोरी (५०) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगल कोरीच्या खून प्रकरणात इमामवाडा पोलिसांनी रोहन कमलाकर चावरीया (३४) त्याचा लहान भाऊ रोहित कमलाकर चावरीया (३२) आणि कुंदन देविदास चव्हाण (४९) या तीन आरोपींना रविवारी पहाटेच्या सुमारास अटक केली.

### तीनही आरोपींना अटक

इमामवाडा पोलिसांनी रोहन आणि रोहित चावरीया भावंडासह कुंदन चव्हाण या तीनही आरोपींविरुद्ध हत्याकांडाचा गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेचे पथक आणि इमामवाडा पोलिसांनी आरोपींची लगेच शोध मोहिम सुरु केली. तीनही आरोपींना पहाटे विविध ठिकाणांवरुन अटक केली. आरोपींपैकी रोहन चावरिया आणि कुंदन चव्हाण विरोधात यापूर्वी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

माहितीनुसार, चावरीया भावंडांची इमामवाडा-जाततरोडी परीसरात चांगली दहशत आहे. गुन्हेगार चावरीया भावंड सामान्य नागरिकांना त्रस्त करीत दबदबा कायम ठेवतात. इमामवाडा पोलिस ठाण्याच्या मागच्या गल्लीत राहणारे मंगल कोरी आणि चावरीया भावंडांमध्ये क्षुल्लक कारणावरून गेल्या काही दिवसांपासून वाद सुरु होता. शनिवारी रात्री मद्य प्राशन करून आलेल्या रोहन चावरीयाने घराबाहेर उभ्या असलेल्या मंगल कोरी यांना शिविगाळ सुरू केली. त्याचा आवाज एकून मंगलचा मुलगा शुभमने आक्षेप घेतला. त्याच वेळी रोहनचा भाऊ रोहित चावरिया आणि मित्र कुंदन चव्हाण या तिघांनी मंगल कोरीया यांना मारहाण सुरू केली.

रोहनने लाकडी दांड्याने मंगल यांच्यावर हल्ला केला. मंगलच्या डोक्यावर दंड्याचा मार बसल्यामुळे तो गंभीर जखमी झाले. मंगल रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळले. मंगल मृत पावल्याचे बघून आरोपींनी तेथून पळ काढला.कुटुंबियांनी मंगल यांना मेडिकल रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या हत्याकांडाबाबतत इमामवाड्याचे ठाणेदार जयवंत पाटील यांना विचारणा केली असता त्यांनी कामात व्यस्त असल्याची प्रतिक्रिया दिली.

# भाजपच्या कार्यकाळात नागपूरचा कायापालट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



## महापालिका निवडणुकीसाठी भाजपचा जाहिरनामा प्रसिद्ध

महापालिका निवडणुकीसाठी नुकताच कॉंग्रेसच्या जाहिरनाम्यातून ३० हजार लिटर मोफत पाणी, मोफत बस सेवेचे आश्वासन दिले. आज भाजपने महापालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यातून ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मनपा बसमधून मोफत बसप्रवासाचा अपवाद वगळला तर मोफत योजनांना बगल दिली आहे. भाजपने जाहिरनाम्यातून जुन्याच योजनांना पुढे घेऊन जाण्यासोबत नागपुरात विदेशी दूतावास, मेट्रो टप्पा तीनचा संकल्प केला असून यातून नागपूरकरांसाठी सर्वोत्तम क्रमांक एकच्या शहराची उभारणी करण्याची ग्वाही दिली. कॉंग्रेसच्या जाहिरनाम्यातील ५०० वर्गफूट घरांना मालमत्ता करापासून मुक्त करण्याची घोषणा भाजपनेही त्यांच्या जाहिरन्यातून केली आहे.

महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शहर भाजपाध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार प्रवीण दटके, आमदार परिणय फुके, माजी आमदार प्रा. अनिल सोले, सुधाकर कोहळे, गिरीश व्यास, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, निवडणूक प्रमुख संजय भेंडे, माजी महापौर नंदा जिचकार, भाजप नेते जयप्रकाश गुप्ता यांच्या उपस्थितीत रामदासपेठेतील हॉटेल तुली इम्पेरिअलमध्ये जाहिरनामा प्रकाशित करण्यात आला.

भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी जाहिरनाम्यातील वैशिष्ट सांगताना म्हणाले, महापालिकेतील भाजपच्या २० वर्षांच्या काळात शहरात अनेक कामे झाली. २०१७ मध्ये जे वचन भाजपने दिले. ती सर्व पूर्ण करण्यात यश आले. परंतु २४ बाय ७ योजनेंतर्गत संपूर्ण शहरात २४ तास पाणीपुरवठा करण्यात अद्यापही यश आले नाही. पुढील काळात संपूर्ण शहरात २४ तास पाणी देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शहराचा कायापलट करण्याचे काम भाजपने खऱ्या अर्थाने सुरू केल्याचा दावा करीत त्यांनी सुरुवातील गेल्या काळात केलेल्या कामाचा पाढा वाचला. ६० हजार झोपडपट्टीवासींना पट्टे वाटप, मलजल निःस्सारण योजनेच्या कामांना गती, पाकिस्तानातील सिंध प्रांतातून आलेल्या सिंधी बांधवांना मालकी पट्टे, जलकुंभाची बांधणी, तलावांचे संवर्धन व सौंदर्यीकरण, उद्यान, मैदानाचा विकास, सिमेंट रस्ते, कचऱ्यावर प्रक्रिया आदी मागील काळात केलेल्या योजनांची माहिती त्यांनी दिली.

येत्या काळात संपूर्ण शहर लिजमुक्त करण्याची ग्वाही तिवारी यांनी जाहिरनाम्यातून दिली. नासुप्रच्या ले-आऊटमध्ये नागरिकांना ग्राऊंड रेंटसह मालमत्ता करही भरावा लागतो. संपूर्ण शहर लिजमुक्त केल्यानंतर या नागरिकांवरील ग्राऊंड रेंटचा भुर्दंड बसणार नाही. येत्या काळात नाग नदी पुनरुज्जीवनाच्या कामांना गती, पोहरा नदी पुनरुज्जीवनासाठी नवीन सिवेज लाईनची कामे सुरू करण्याची ग्वाहीही देण्यात आली.

# पेट्रोल टाकून दाम्पत्याला जाळण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ११ :

लाखनी तालुक्यातील पोहरा येथे रस्ता अडवून उभ्या असलेल्या तरुणांना दुचाकी बाजूला करण्यास सांगणे एका दाम्पत्याला चांगलेच महागात पडले. या क्षुल्लक कारणावरून संतापलेल्या दोन सराईत गुन्हेगारांनी पती-पत्नीसह त्यांच्या पुतण्यावर पेट्रोल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा धक्कादायक प्रयत्न केला. याप्रकरणी लाखनी पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली.

पोहरा येथील रहिवासी विरांगणा विलास मेश्राम आणि त्यांचे पती पायी जात असताना ही घटना घडली. पोहरा परिसरात धम्मराज नेमीचंद मेश्राम (३२) आणि भीमराज नेमीचंद मेश्राम (२९) दोन्ही रा. सेलोटी यांनी दुचाकी रस्त्याच्या मधोमध उभी केली होती. मेश्राम यांनी त्यांना गाडी बाजूला घेण्याची विनंती केली असता, आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आम्ही नुकतेच कारागृहातून बाहेर आलो आहोत, आमचे कोणी काही वाकडे करू शकत नाही, अशी धमकी देत आरोपींनी स्वतःजवळील बाटलीतील पेट्रोल दांपत्याच्या अंगावर ओतले.

आरोपींनी एवढ्यावरच न थांबता दांपत्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि आगपेटी काढून त्यांना पेटवण्याचा प्रयत्न केला. यावेळी पती-पत्नीला वाचवण्यासाठी आलेला त्यांचा पुतण्या याच्यावरही आरोपींनी पेट्रोल ओतून त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे लाखनी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# सरकारी निधीतून निवडणूक जिंकण्याचा भाजपचा फंडा

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ११ :



सरकारी निधीचा वापर करून निवडणुका जिंकण्याचा भाजपचा फंडा आहे. महागाई वाढवून लाडक्या बहिणींच्या बटव्यातून पाच हजार काढत शासकीय तिजोरीतून त्यांच्या खात्यात दीड हजार टाकले जातात. हे भाजपचे पाप आहे, अशी टीका कॉंग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी आज येथे केली.

अकोला महापालिका निवडणुकीतील कॉंग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ ते आज आले होते. माध्यमांशी संवाद साधतांना विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर निशाणा साधला. लाडकी बहीण योजनेला कॉंग्रेसचा विरोध असल्याच्या भाजपच्या टीकेला त्यांनी प्रत्युत्तर दिले. विजय वडेट्टीवार म्हणाले, ह्यसत्ताधारी एका दिवसातून लाडक्या बहिणींचे पाच हजार रुपये लुटून नेत आहेत. ५० रुपये किलोचे तेल १५० रुपये केले. ४० रुपये किलो मिळणारी दाळ आता १२० रुपये झाली. गृहिणींचे संपूर्ण बजेटच कोलमडून टाकण्याचे पाप भाजप करीत आहे. सरकारी तिजोरीतून दीड हजार रुपये वाटून लूट करण्याचे काम केले जात असून त्याला लाडकी बहीण हे नाव देण्यात आले. लाडकी बहीण आता भुलणार नाही. महागाई वाढवून सत्ताधारी त्यांची लूट करतात, हे आता लपून राहिलेले नाही.

आमच्या एका उमेदवाराने असे म्हटले की १४ तारखेला तुम्ही पैसे का टाकताय? १५ ला मतदान आहे. सरकारी निधीचा वापर करून निवडणुका जिंकण्याचा भाजपचा फंडा आहे. पैसेच टाकायचे होते, तर ते अगोदर टाकायला पाहिजे किंवा नंतर करायला पाहिजे. निवडणुकीच्या तोंडावर हे करणे म्हणजे त्याचा निवडणुकीवर परिणाम होईल. आम्ही त्याला विरोध केलेला नाही. शब्द फिरवण्यात भाजप हुशार आहे. जनतेला सर्व माहिती आहे, अशा शब्दात विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीका केली. यावेळी कॉंग्रेस नेते प्रकाश तायडे, प्रदीप वखारिया, महानगराध्यक्ष प्रशांत वानखडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रावर १० लाख कोटींचे कर्ज उभे केले. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री केवळ स्वतःच्या फायद्याच्या गोष्टी करत राज्याची तिजोरी लुटत आहेत. निवडणुका आल्या की वेगळे लढतात. अजित पवारांना केवळ कॉंग्रेसची मते खाण्यासाठी बाजूला ठेवले. जे जातीय आणि धर्मांध शक्तींसोबत जाऊन बसतात, ते धर्मनिरपेक्ष कसे असू शकतात? ७० वर्षांत कॉंग्रेसनेच देश उभा केला. आयत्या बिळावर नागोबा सारखे हे लोक येऊन बसले आहेत, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

# ट्रक व कारच्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू





■ महासागर प्रतिनिधी, चांदूर रेल्वे, दि. ११ :

चांदूर रेल्वेपासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर चांदूर रेल्वे-अमरावती मार्गावरील बासलापूर नजीक असलेल्या मच्छी तलावाजवळ रविवारी (ता. ११) दुपारी १२.१५ वाजताच्या सुमारास ट्रक व कार यांच्यात समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात कार चालकाचा जागीच मृत्यू झाला.

मृत व्यक्तीचे नाव अमित गजाननराव पांडे (वय ४५, रा. अमरावती) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार अमित पांडे हे आपल्या चारचाकी वाहनाने (कार क्र. MH ०४ E ९९९४) चांदूर रेल्वेकडून अमरावतीकडे जात होते. यावेळी समोरून येणाऱ्या ट्रक (क्र. MH 27 B ९४९८) व कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की कार पूर्णपणे चकनाचूर झाली आणि चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. जेसीबीच्या मदतीने रस्त्यावर अडथळा ठरलेली कार बाजूला करण्यात आली. तसेच कारमध्ये अडकलेला मृतदेह बाहेर काढण्यासाठी स्थानिक नागरिकांनी पोलिसांना मदत केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी स्थानिक ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. घटनास्थळी पोलीस कर्मचारी जगदीश राठोड व अतुल शिरसाट यांनी उपस्थित राहून वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

# चना पोहा विथ गडकरी विशेष संवादात्मक कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या नागपूर शहराच्या वतीने चना पोहा विथ गडकरी नावाचा एक विशेष संवादात्मक कार्यक्रम आयोजित केला आहे. सोमवार १२ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता एनआयटी बगीचा सक्करदरा येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागरिकांशी संवाद साधतील. या कार्यक्रमात सध्या देशभरातील तरुणाईची क्रश म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री गिरिजा नितीन गडकरींची मुलाखत घेणार आहे. नागपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दीर्घकालीन दृष्टिकोन सादर करण्याच्या उद्देशाने चना पोहा विथ गडकरी नावाचा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा देवाभाऊ विथ तर्री पोहा कार्यक्रम यापूर्वीच घेण्यात आला होता.

# अॅडव्हांटेज विदर्भमुळे विदर्भाच्या क्षमता कळल्या

## अॅडव्हान्टेज विदर्भच्या कार्यालयाचे उद्घाटन व भूमिपूजन संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :




असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटतर्फे मागील दोन वर्षांपासून आयोजित होत असलेल्या अॅडव्हान्टेज विदर्भमुळे विदर्भाच्या औद्योगिक क्षमता समोर आला असून त्यामुळे विकासाची प्रक्रिया गतीने सुरू झाली आहे, असे गौरवोद्गार गोयल गंगा ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अतुल गोयल यांनी काढले.

तीन दिवसीय अॅडव्हान्टेज विदर्भ २०२६ - खासदार औद्योगिक महोत्सव येत्या, ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या आयोजित करण्यात येणार असून या उपक्रमाची सुरुवात रविवारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसर, अंबाझरी रोड, येथे भूमिपूजन समारंभ व कार्यालय उद्घाटनाने झाली. यावेळी अॅडव्हांटेज विदर्भच्या वेबसाईटचे देखील विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सुरुवातीला गोयल स्टीलचे चेअरमन अशोक गोयल व पौर्णिमा गोयल यांच्य हस्ते विधीवत पूजन झाल्यानंतर डॉ. अतुल गोयल यांनी कुदळ मारून व नारळ फोडून भूमिपूजन केले. यावेळी आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे, सचिव डॉ. विजयकुमार शर्मा, कार्यकारी सदस्य राजेश रोकडे, विनोद तांबी, डॉ. महेंद्र क्षिरसागर, चैतन्य देशपांडे, शिवा राव यांची मंचावर उपस्थिती होती.

नागपूर व परिसरात मोठ्या प्रमाणात टॅलेंट असून ते बाहेर जाण्याऐवजी येथेच कसे थांबवता येईल, यावर अभ्यास व संशोधन करण्याची गरज असल्याचे डॉ. अतुल गोयल यांनी नमूद केले.

# प्रेयसीच्या भावावर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

वर्षभरापासून प्रेमसंबंध असतानाही प्रेयसीच्या जीवनात दुसरा युवक आला. त्यामुळे तिने पहिल्या प्रियकरापासून दुरावा निर्माण करुन मित्रासोबत फिरणे सुरु केले. त्यामुळे चिडलेल्या प्रियकराने प्रेयसीवर हल्ला केला. तसेच तिला वाचविण्यासाठी समोर आलेल्या तिच्या भावावरही कोयत्याने वार करुन जखमी केले. ही घटना यशोधरानगर भागातील पिवळी नदी परिसरात उघडकीस आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दहावीत शिकणाऱ्या १५ वर्षीय मुलीची वर्षभरापूर्वी कुणाल सलामे या युवकाशी मैत्री झाली. त्याचे रुपांतर प्रेमात झाले. गेल्या वर्षभरापासून प्रेमसंबंध दोघांमध्ये होते. मात्र, तिच्या जीवनात आणखी एक युवक आला. त्यानेही तिच्याशी मैत्री आणि प्रेमसंबंध ठेवले. दुसऱ्या प्रियकरामुळे ती कुणालला टाळत होती. मात्र, कुणाल तिला बळजबरी भेटत होता. ही बाब घरच्यांच्या माहिती झाल्याने वडिलांनी मुलीला व कुणालला समजावून सांगितले.

# १८ हजार वृक्षतोडीच्या मोबदल्यात मिळणार ३२ कायमस्वरूपी नोकऱ्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

चंद्रपूर जिल्ह्यात दरवर्षी सरासरी ५० निष्पाप नागरिक वाघांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडत असताना, हा संघर्ष कमी करण्याऐवजी राज्य सरकार लोहारडोंगरी येथील लोहखनिज खाणीला परवानगी देऊन परिस्थिती अधिक गंभीर करण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याची तीव्र टीका इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष आणि राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे माजी सदस्य बंडू धोतरे यांनी केली आहे.

केवळ ३२ कायमस्वरूपी नोकऱ्यांचे आमिष दाखवून सुमारे १८ हजार पूर्ण वाढलेली झाडे तोडण्याचा आणि वाघांचे नैसर्गिक भ्रमणमार्ग बंद करण्याचा हा प्रयत्न असल्याचे धोतरे म्हणाले. या निर्णयामुळे ताडोबा आणि ब्रह्मपुरी परिसरातील वाघांचे स्थलांतर रोखले जाईल आणि परिणामी वाघ-मानव संघर्ष आणखी तीव्र होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

ताडोबा जंगलापासून लोहारडोंगरी वनक्षेत्रापर्यंत वाघांचे उत्तर व पूर्व दिशेने होणारे नैसर्गिक स्थलांतर हा संपूर्ण व्याघ्र अधिवासासाठी अत्यंत महत्त्वाचा कॉरिडॉर आहे. या मार्गात खाण सुरू झाल्यास ताडोबा-ब्रह्मपुरी पट्ट्यातील जैविक संतुलन बिघडण्याची भीती आहे. वनविभागाकडून संघर्ष कमी करण्यासाठी होणारा खर्च आणि शासनाकडून दिली जाणारी नुकसानभरपाई ही खाणीच्या कथित आर्थिक फायद्यापेक्षा अधिक असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

राज्य सरकारने नेमलेल्या त्रिसदस्यीय तज्ज्ञ समितीने हा प्रकल्प स्पष्टपणे नाकारल्याचे दाखवले असले तरीही त्यात पळवाटांना जागा ठेवली., त्यातून होणारे नुकसान हे फायद्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त असल्याचे नमूद केले आहे. २०२१ मध्ये स्थापन केलेल्या चंद्रपूर जिल्हा वाघ-मानव संघर्ष राज्यस्तरीय तांत्रिक अभ्यास समितीचा अहवाल सरकारने स्वीकारलेला असतानाही, त्याच्या शिफारशींकडे दुर्लक्ष करून व्याघ्र अधिवासात खाणीस परवानगी देणे ही चिंताजनक बाब असल्याचे धोतरे यांनी सांगितले.

# एक चुकीचे मत तर शहर विकासापासून दूर

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ११ :




महापालिकेची निवडणूक शहर विकासाच्या मुद्द्यावर लढली जात आहे. भाजपकडे विकासाचा आराखडा तयार आहे. मतदारांचे एक चुकीचे मत शहराला विकासापासून दूर ठेऊ शकतो, असे मत महसूल मंत्री तथा भाजपाचे प्रदेश निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

अकोला महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जुने शहर व शिवाजी पार्क येथे झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर पालकमंत्री अॅड. आकाश फुंडकर, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आ. वसंत खंडेलवाल विजय अग्रवाल, बळीराम सिरस्कार यांच्यासह भाजप पदाधिकारी व उमेदवार उपस्थित होते.

हिंदुत्ववादी मतांचे विभाजन टाळण्याचे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी करून विरोधकांवर निशाणा साधला. पुढे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काही जण केवळ मतांचे दान मागून पळणारे असतात. भाजपने सदैव जनहित लक्षात घेतले आहे. अकोला जिल्ह्यातील मालमत्तांची नकाशासह संपूर्ण माहिती त्यांच्या मोबाइलवर देण्याची तयारी सरकारने केली आहे. महायुती सरकारच्या कार्यकाळात लाडकी बहीण योजना बंद होणार नसून लखपती दिदी योजनेच्या माध्यमातून मातृशक्तीला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य केले जाणार आहे.

### चंद्रशेखर बावनकुळे यांचा सावधगिरीचा इशारा

अकोल्याचा विकास कसा घडेल, याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. विकास आराखडा तयार आहे.

१२६ विकास योजनांची प्रभावी अंमलजबजावणी केली जाणार आहे. रस्ते, वीज, पाणी यासारख्या मूलभूत योजना सोडवण्यासह उड्डाणपूल, श्री राजराजेश्वर मंदिर विकास, भूमिगत गटार योजना, शहर बससेवा आदी मार्गी लावण्यात येतील, असे बावनकुळे यांनी सांगितले.

श्री राजराजेश्वर मंदिरावर असामाजिक तत्त्वांनी हल्ला केला होता. या शहरांमध्ये धुमाकूळ घालण्याचा प्रयत्न केला होता. राज्य सरकारने कायदा व सुव्यवस्था योग्य पद्धतीने हाताळून संरक्षणाचे कार्य केले, असे आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले. खासदार अनुप धोत्रे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांसह अकोला महापालिकेच्या कार्याची माहिती दिली.

### लाडक्या बहिणींविषयी कॉंग्रेसची द्वेषाची भावना

राज्यातील लाडक्या बहिणींविषयी कॉंग्रेसमध्ये द्वेषाची भावना ठासून भरली आहे. लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद कॉंग्रेस व त्यांच्या नेत्यांना बघवत नाही. कॉंग्रेसच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेचे पैसे देऊ नका, असे पत्र महाराष्ट्र निवडणूक आयोगाला दिले. कॉंग्रेसचा हा खरा चेहरा आता पुढे आला आहे, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.